दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | मंगळवार, दि.३ जून २०२५ | वर्षे ४थे | अंक २८५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडींसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# महायुतीत मंत्रीच अस्वस्थ?

विरोधकांकडे पुरेस संख्याबळ नसल्याने फावले | बाहेरील संकटांपेक्षा आतील संकटांचा सामना | सरकारच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता

## अधिकार मिळेनात? मुख्यमंत्री फडणवीसांना साकडे!

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:महायुतीची सत्ता येऊन सहा महिन्याचा कालवाधी होत आला. विरोधकांकडे पुरेस संख्याबळ नसल्याने सरकारपुढे काही अडचण नसल्याचे चित्र आहे. मात्र, बाहेरील संकटांपेक्षा आतील संकटांचा सामना महायुती सरकारला आता करावा लागतो आहे.महायुती सरकारमध्ये मंत्रिपद मिळाले मात्र अधिकार मिळाले नसल्याची तक्रार राज्यमंत्र्यांकडून करण्यात येत आहेत. कॅबिनेट मंत्र्यांकडून आपले अधिकार राज्यामंर्त्यांना देण्यासाठी टाळाटाळ करण्यात येत असल्याची बोलले जात आहे.राज्यमंत्र्यांनी आपली तक्रार उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांना काही अधिकार दिले आहेत. मात्र, इतर खात्यांमध्ये राज्यमंत्र्यांना कॅबिनेट मंत्र्यांनी अधिकार दिले नसल्याची चर्चा आहे.राज्यमंत्र्यांना अधिकार कॅबिनेट मंत्री देत नसल्याने थेट सरकारच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे. राज्यमंर्त्यांमध्ये अस्वस्था वाढत असून पावसाळी अधिवेशनाच्या आधी यावर तोडगा निघाला नाही तर ही अस्वस्था आणखी वाढत जाण्याची शक्यता आहे.




### मंत्रिमंडळ नसेल तरी फरक पडत नाही:राऊत

नाशिक दौ–यावर असलेले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी राज्यमंत्र्यांनाअधिकार दिले जात नसल्याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, ज्या मंत्र्यांचे काय घेऊन बसला आहात? राज्यातील कॅबिनेट मंत्र्यांना तरी कोणते अधिकार दिले आहेत. राज्यात आणि केंद्रात सगळीकडे मंत्र्यांना काहीही अधिकार नाहीत.

# डीएमकडून देशमुख कुटुंबियांचे सांत्वन!

ऋणानुबंध: आर.टी.जीजांच्या आठवणींना दिला उजाळा



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी आज माजी आमदार तथा भाजपचे नेते स्वर्गीय आर. टी. जिजा देशमुख यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या स्मृतिस आदरांजली अर्पण करत देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन केले. स्व. आर. टी. देशमुख यांचे एका कार अपघातात लातूर जिल्ह्यातून परतत असताना दुर्दैवी निधन झाले होते. मात्र त्यावेळी धनंजय मुंडे हे विपश्यना केंद्रात असल्याने अंत्यविधिस उपस्थित नव्हते.

धनंजय मुंडे यांनी देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली तेव्हा ते चांगलेच भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. आर. टी. देशमुख हे स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब तसेच स्व. पंडित अण्णा मुंडे यांच्या सोबत अगदी तळागाळात काम केलेले एक सच्चे सहकारी म्हणून सुपरिचित होते. त्यांच्या आठवणींना उजाळा देताना मुंडेसह देशमुख कुटुंबीय सुध्दा भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. जीजांचे अकाली निधन ही देशमुख कुटुंबाइतकीच मुंडे कुटुंबाची सुद्धा हानी असून आता तिहाने कधीही भरून निघणार नाही अशा शब्दात धनंजय मुंडे यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. यावेळी आरटीजीसांचे ज्येष्ठ बंधू एच. टी. देशमुख एम.टी देशमुख, जे. टी. देशमुख, पुत्र रोहित देशमुख, राहुल देशमुख, अभिजित देशमुख यांसह देशमुख कुटुंबीय तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, माणिकभाऊ फड, रामेश्वर मुंडे यांसह आदी उपस्थित होते.

## गोपीनाथराव मुंडे गडावरचा कार्यक्रम प्रेरणा अन् उर्जेचा!

मंत्री पंकजा मुंडे:उपस्थित राहण्याचे सर्वांना निमंत्रण

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी:लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा पुण्यतिथी दिन म्हणजेच तीन जून हा गोपीनाथ मुंडे परिवाराचा पारिवारिक कार्यक्रमासून हा कार्यक्रम पारंपरिक पद्धतीने साजरा होणार आहे.कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन केले असुन सर्वांनी उपस्थित राहावे असे निमंत्रण ना. पंकजाताई मुंडे यांनी दिले आहे.

याबाबत ना. पंकजाताई मुंडे यांनी एका व्हिडिओद्वारे सर्व मुंडे प्रेमींना आवाहन केले आहे. ३ जून हा दिवस उजडूच नये असे आपल्या सर्वांनाच वाटते. मात्र गोपीनाथराव मुंडे यांच्या विचारावर मार्गक्रमण करून प्रेरणा व ऊर्जा घेण्यासाठी तीन जूनला आपण सर्वजण मोठ्या संख्येने गोपीनाथ गडावर येत असता. त्या दृष्टिकोनातून यावर्षीही तीन जून रोजी पारंपरिक पद्धतीने हा पुण्यतिथी दिन » पान २ वर


## अनिल दादांची गोष्टच निराळी

कार्यकर्त्यांनो माझ्या वाढदिवसाला बॅनर न लावता गरजूंना मदत करा

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांचा वाढदिवस येत्या बुधवार, ४ जून रोजी असून प्रत्येक वर्षी हा दिवस जिल्हाभरातील शिवसैनिकांसाठी एक उत्सव असतो. निष्ठावंत शिवसैनिकांकडून अनिलदादांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात, शहरभर बॅनर्स लावले जातात आणि हा दिवस जल्लोषात साजरा होतो. मात्र यंदा अनिलदादांनी आपल्या शिवसैनिकांना एक भावनिक आणि विचारप्रवृत्त करणारे आवाहन केलं आहे. त्यांनी आपल्या अधिकृत फेसबुक पेजवरून शिवसैनिकांना सांगितलं आहे की, माझा वाढदिवस बॅनरमुक्त करा. हे बॅनर लावण्यासाठी लागणारा खर्च लाखोंच्या घरात जातो. त्याऐवजी हा पैसा गरजूंवर खर्च करा. अनिलदादांचे हे आवाहन केवळ एक विनंती नसून समाजासाठी आपली » पान २ वर




आक्रमक | गुत्तेदार इंजिनियकडून लाखोचा भ्रष्टाचार

## खरात आडगाव जलजीवनचे काम निकृष्ट

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:तालुक्यात खरात आडगाव येथे गावाला पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळावे म्हणून जलजीवन अंतर्गत योजना राबवण्यात आली मात्र सदर योजनेत जल जीवन चे काम निकृष्ट करण्यात आले असून सदर योजनेच्या गावात कुठलाच फायदा होत नाही सदर योजनेमध्ये इंजिनियर आणि गुत्तेदार यांनी लाखो रुपयाचा भ्रष्टाचार केल्याने खरात आडगावकर आणखीनही पाण्यापासून वंचित आहेत गुत्तेदार आणि इंजिनियर यांच्यावर चौकशी करून तात्काळ कारवाई करा या मागणीसाठी गावकरी आंदोलन करणार असल्याचे कळत आहे

माजलगाव तालुक्यातील खरात आडगाव बहुजन समाजाचा गाव खरात आडगाव मधील लोकसंख्या एकूण जवळपास आठ हजाराच्या पुढे आहे गाव मोठा असल्याने गावाचा कायमस्वरूपी पाणी प्रश्न सोडवण्यासाठी बीड जिल्हा परिषदेने जल जीवन योजनेअंतर्गत गावाचा समावेश करून गावाला शुद्ध पाणी मिळावे म्हणून प्रयत्न केले मात्र जल जीवन योजनेचे इंजिनीयर आणि गुत्तेदार यांनी यामधूनही फक्त पैसे कमवीण्याचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून काम केले निकृष्ट दर्जाचे पाईप वापरल्याने गावकऱ्यांना पाणी मिळणे अगोदरच पाईपलाईन शंभर जागेवर फुटली यामुळे खरात आडगाव येथील जनता पाण्यापासून वंचित राहिले जल जीवन योजना म्हणजे गुत्तेदार पोचण्याची योजना आहे का? असा प्रश्न गावकरी व्यक्त करत आहेत सदर गुटेदाराने आणि इंजिनीयरने निकृष्ट दर्जाची जलजीवन योजना राबवली यामध्ये पाणी साठवण्यासाठी पाण्याच्या उंच टाकीचे प्रयोजन असते टाकी तर उभा राहिलीच नाही मग पाणी साठवणार कुठे? जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे काय साठे लोटे तर नाही ना असा प्रश्न खरात आडगाव येथील जनतेला पडला असेल सदर गुत्तेदार आणि इंजिनियर यांचे बिलीन काढू नका अन्यथा खरात आडगाव येथील समस्त गावकरी बहुसंख्येने उपस्थित राहून जिल्हाधिकारी कार्यालय यांच्यासमोर आंदोलन करतील असा इशारा गावकऱ्यांनी बोलताना व्यक्त केला आहे.



## कोणासाठी? कशासाठी?

आर्थिक, सामरिक, लष्करी इत्यादी इत्यादी मुद्द्यांवर रशियाच्या पासंगासही पुरू न शकणाऱ्या युक्रेनसारख्या देशाने एकाच दिवसात एके काळच्या महासत्तेच्या विमानांचा ताफाच्या ताफा जायबंदी करून टाकावा ही बाब अशक्य कोटीतील. एका अर्थी युक्रेनने जे केले त्याचे वर्णन रशियाचा 'पर्ल हार्बर' क्षण असे करता येईल. दुसरे महायुद्ध ऐन भरात असताना १९४१ साली जपानने कमालीच्या आव्हानात्मक मोहिमेत अमेरिकेच्या पर्ल हार्बरवर हल्ला करून अमेरिकी नौकांस जागच्या जागी जलसमाधी द्यावी त्याप्रमाणे ताज्या हल्ल्यात युक्रेनने आश्चर्यकारक आक्रमकता दाखवून रशियात खोलवर तब्बल चार हजार किमीची मुसंडी मारून रशियाच्या विमानांना बचावाची संधीच दिली नाही. युक्रेनने या हल्ल्यात रशियाच्या अत्यंत महत्त्वाच्या, संख्येने मोजक्या अशा अण्वस्त्र वाहक विमानांसही लक्ष्य केले. आश्चर्य युक्रेनच्या या हल्ल्याचे जसे आहे तसेच, किंबहुना त्याहूनही अधिक, ते आहे रशियाच्या कबुलीचे. युक्रेनच्या या हल्ल्यानंतर अवघ्या काही तासांत रशियाच्या वतीने जे काही झाले त्याची वस्तुस्थिती सादर केली गेली आणि 'युक्रेनच्या ड्रोन्सनी रशियात खोलवर मुसंडी मारून आमच्या अनेक विमानांचे आणि विमानतळांचेही नुकसान केले', अशी कबुलीही दिली गेली. या प्रामाणिकपणासाठी रशियाचे नेतृत्व कौतुकास पात्र ठरते. रशियाने हे सत्य मान्य केले आणि पाठोपाठ युक्रेनला जन्माची अद्दल घडवण्याचा इशाराही दिला. तो इशारा रशिया प्रत्यक्षात आणेलही. पण यात लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे 'पर्ल हार्बर' घडले तेव्हा ते घडवून आणणाऱ्या जपानपेक्षा कित्येक पट सामर्थ्यवान अमेरिकेने त्या वेळी त्याची कबुली दिली होती आणि पुढे जपानला धडा शिकवला. जे काही झाले ते कबूल करण्यात ना अमेरिकेस त्या वेळी कमीपणा वाटला ना आता रशियास तसा तो वाटतो. तेव्हा प्रश्न असा की आपले संरक्षणदल प्रमुख अनिल चौहान यांनी ताज्या संघर्षात पाकिस्तानने आपली काही विमाने पाडल्याची कबुली दिली; त्यावर इतका गहजब होण्याचे कारण काय? युद्ध म्हटले की हे आलेच. महत्त्व असते ते शेवटी अंतिम निकालास. तो नि:संशयपणे आपल्या बाजूने लागलेला आहे आणि आपण पाकिस्तानला धडा शिकवलेला आहे. असे असताना या संघर्षात पाकिस्तानने आपले काही नुकसान केले असेल तरी ते मान्य केले तर इतका गदारोळ का? यातही एक हास्यास्पद प्रकार म्हणजे चौहान यांनी जी काही विधाने केली त्यास 'कबुली' म्हणावे की नाही, यावर होत असलेली चर्चा. कबुली ही गुन्ह्याची देतात आणि आपण तर काही गुन्हा केलेला नाही, सबब त्यास कबुली कसे म्हणायचे, असा प्रश्न एका वैचारिक बावळट वर्गास पडलेला दिसतो. कबुली म्हणायचे नसेल तर मग चौहान यांनी जी काही विधाने केली त्यास काय म्हणावे? खरे तर या समाजमाध्यमी वैचारिक वेठबिगारांनी 'कबुली' या शब्दावर घेतलेल्या भाषिक शंकेपेक्षाही एक महत्त्वाचा मुद्दा संरक्षणदल प्रमुखांनी सिंगापूर येथील मुलाखतीत मान्य केला. पाकिस्तानच्या कृतीनंतर तब्बल दोन दिवस आपणास आपले विमान दल जमिनीवर ('ग्राउंडेड') राखावे लागले, हा तो मुद्दा. त्याचा अर्थ असा की पाकिस्तानने आपल्या विमान दलाचे मोठे नुकसान केल्यानंतर काही काळ आपणास आपली हवाई हल्ला मोहीम स्थगित करावी लागली. त्यानंतर आपण सगळ्या मोहिमेची फेरआखणी केली आणि आपल्या विमान दलाने चमकदार कामगिरी करत पाकिस्तानात खोलवर मारगिरी करून त्यांचे अतोनात नुकसान केले. ''पाकिस्तानने आपले नुकसान किती केले यापेक्षा त्या नुकसानीनंतर आपण काय केले; ही बाब अधिक महत्त्वाची ठरते'', असे चौहान म्हणतात त्यात काहीही गैर नाही. तरीही त्यांच्या या कबुलीनिदर्शक विधानावर आपल्याकडे बरीच नाराजी निर्माण झाल्याचे दिसते. ते पाहून काही प्रश्न उपस्थित होतात.

जसे की मुळात या संघर्षात जे काही झाले त्याचा हिशेब जाहीरपणे मांडण्याचा अधिकार संरक्षणदल प्रमुख चौहान यांस दिला कोणी? केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी या संदर्भात जनरल चौहान यांस मुखत्यारपत्र दिले होते काय? तशी शक्यता कमीच. कारण संरक्षणमंत्र्यांचा एकूण आवाका आणि तूर्त त्यांस दिले गेलेले अधिकार पाहता राजनाथ सिंह यांच्या वतीने असे काही केले गेले असण्याची शक्यता नाही. म्हणजे मग राहता राहिले पंतप्रधान कार्यालय वा खुद्द पंतप्रधान. देशाच्या सर्वोच्च नेत्याची परवानगी असल्याखेरीज जनरल चौहान स्वत:च्या हिमतीवर इतके विधान करू शकतील काय? तसे त्यांनी केले असेल काय? इतकी स्वतंत्र प्रज्ञा त्यांच्या ठायी आहे काय? आणि तशी ती असूनही त्यांना या पदावर नेमण्याचा मोठेपणा केंद्राने दाखवला काय? यापेक्षाही अधिक महत्त्वाचा मुद्दा असा की ही कबुली द्यायचीच होती तर त्यांनी 'रॉयटर्स'सारख्या 'पाश्चात्त्यधार्जिण्या' आणि म्हणून 'भारत-विरोधी' वृत्तसेवेची निवड का बरे केली? अनेक भारतीय वृत्तवाहिन्यांनी एक चकार शब्द न काढता, कोणताही उलट प्रश्न न विचारता जनरल चौहान यांचे विधान दिवस-दिवस 'चालवले' असते आणि ''पाहा भारतीय लोकशाही किती प्रामाणिक, पारदर्शी आहे'', त्याची दवंडीही पिटली असती. म्हणजे अलीकडे विविध विक्री योजनांत 'वन प्लस वन', एकावर एक मोफत काय काय दिले जाते, तद्वत या विधानाच्या प्रसारणाबरोबर लोकशाही प्रचारही त्यांनी मोफत केला असता आणि पाकिस्तानला त्याची जागा दाखवून दिली असती. परंतु जनरल चौहान यांनी रॉयटर्सची निवड केल्याने हे काहीच झाले नाही. भारतीय वाहिन्यांची ही संधी हुकली आणि बातम्यांतील निवडक तुकडे समाजमाध्यमी फिरते ठेवण्याचा राष्ट्रप्रेमी उद्योग वैचारिक वेठबिगारांसही करता आला नाही. आणि परत त्यांनी हे विधान केले ते सिंगापुरात? तेही 'शांग्रिला डायलॉग' या चर्चेच्या निमित्ताने? ते का? तसे पाहू गेल्यास जनरल चौहान हे मूळचे पायदळाचे अधिकारी. त्यांची हयात गेली पायदळात. केंद्राने त्यांना निवृत्योत्तर या पदासाठी पाचारण केले. याआधीचे संरक्षणदल प्रमुख जनरल बिपीन रावत यांच्या अपघाती निधनानंतर हे पद रिक्त झाले आणि तेथे जनरल चौहान यांस नेमले गेले.

# व्यसनामुळे आयुष्य उध्वस्त होते

## डॉ.आदिती सारडा:आदित्य डेंटल कॉलेजमध्ये सप्ताह

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:तरुण पिढीला तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. जागतिक तंबाखू विरोधी सप्ताह या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी समाजात सकारात्मक संदेश पोहोचवला आहे. या महाविद्यालयात कम्युनिटी डेंटिस्ट्री विभाग समाजातील दंत आरोग्य सुधारण्यासाठी विविध आरोग्य तपासणी तसेच जनजागृती शिबिरे आयोजित करत आहे. या उपक्रमांतर्गत, तंबाखूविरोधी जनजागृती आणि सल्ला देण्याची सेवा देखील दिली जाते. या सेवांसाठी कॉलेजकडे सुसज्ज मोबाइल डेंटल व्हॅन आणि पोर्टेबल डेंटल चेअर उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त जनजागृती करून तरूण पिढीला तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे असे आवाहन कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. अदिती सुभाषचंद्र सारडा यांनी केले.



### महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकी जपली

डॉ. आदिती सारडा यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य विषयक जनजागृतीसाठी पुढाकार घेतला आहे. त्यांनी नमूद केले की, या उपक्रमांतून केवळ महाविद्यालया पुरतेच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी आरोग्य दूत घडवण्याचे काम आपण करत आहोत. 'तंबाखू विरोधी सप्ताहा'च्या निमित्ताने आयोजित उपक्रमांनी केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर संपूर्ण बीड शहरात जनजागृतीचे वारे वाहू लागले आहेत. अशा कार्यक्रमांमुळे तरुणांमध्ये आरोग्याबाबतची जागरूकता वाढून त्यांना सशक्त, निर्णयक्षम आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार बनवण्यास मदत होते. डॉ. आदिती सारडा, प्राचार्य रॉबर्ट जस्टीन, उपप्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव यांनी अभिनंदन केले.

**आरोग्य शिबिर व नाटिका सादरीकरण:** महाविद्यालयाच्या कम्युनिटी डेंटिस्ट्री विभागातर्फे आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात, स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यामध्ये दंत तपासणीसह तंबाखू सोडण्यासाठी समुपदेशन सेवा दिली गेली. या सेवेसाठी कॉलेजकडे उपलब्ध असलेल्या मोबाइल डेंटल व्हॅन आणि पोर्टेबल डेंटल चेअर चा योग्य वापर करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सामाजिक नाटकांनी प्रेक्षकांना भावनिक दृष्ट्या हेलावून टाकले. तंबाखूचे परिणाम दाखवणाऱ्या या सादरीकरणानं उपस्थितांमध्ये विचारप्रवृत्तता निर्माण केली.

### सामाजिक बांधिलकीची जाणीव

या सप्ताहाच्या आयोजनामागील प्रमुख हेतू म्हणजे तरुणांमध्ये तंबाखूविरोधी जनजागृती करणे आणि आरोग्यविषयक सकारात्मक वातावरण निर्माण करणे हा होता. यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग व त्यांचा समाजाशी असलेला संवाद हा खूपच प्रभावी ठरला.

आदित्य शिक्षण संस्थेत ३१ मे रोजी जागतिक तंबाखू निषेध दिनानिमित्त आदित्य डेंटल कॉलेज, बीड येथे संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली 'तंबाखू विरोधी सप्ताह' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा बोलत होत्या.महाविद्यालयाच्या वतीने २७ मे ते ५ जून दरम्यान विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सप्ताहात विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी एकत्र येऊन तंबाखूच्या दुष्परिणामाविषयी जनजागृती करण्यासाठी रॅली, पोस्टर स्पर्धा, व्याख्याने व नाटिका यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. तंबाखू आणि त्याच्या सेवनामुळे होणाऱ्या आरोग्यावरच्या गंभीर परिणामांविषयी जनतेमध्ये जागरुकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आदित्य डेंटल कॉलेजने सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यविषयक जनजागृतीच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

# रिक्षा स्टॅण्डसाठी जनतेची मागणी

## प्रश्न:प्रवाशांच्या सोयीसाठी पुढाकार घ्यावा



पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा:पाटोदा शहरात वाढत्या लोकसंख्येसोबतच प्रवाशांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मात्र शहरात एकही अधिकृत रिक्षा स्टॅण्ड नसल्यामुळे प्रवाशांना तसेच रिक्षाचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे शहरात तात्काळ रिक्षा स्टॅण्डची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

शहरातील मुख्य बाजारपेठ, बस स्थानक परिसर, रस्त्यावर तसेच शासकीय कार्यालयांसमोर दररोज रिक्षांची गर्दी दिसून येते. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो, वादविवाद होण्याचे प्रकार घडतात आणि नागरिकांचे वेळेवर ठिकाणी पोहोचणे कठीण होते. याशिवाय रिक्षाचालकांनाही निश्चित जागा उपलब्ध नसल्यामुळे भर उन्हात वा पावसात प्रवाशांची वाट पाहावी लागते.

या संदर्भात स्थानिक नागरिक, व्यापारी आणि रिक्षा युनियनच्या वतीने नगर पंचायत प्रशासनाकडे मागणी होत असून, लवकरात लवकर रिक्षा स्टॅण्डसाठी जागा निश्चित करून सुविधा निर्माण करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

नगर पंचायत प्रशासनाने जनतेच्या या मागणीची दखल घेऊन तात्काळ कृती करावी, अन्यथा पुढील योग्य पावले उचलण्यात येतील,असा इशाराही नागरिकांकडून दिला जात आहे.

# परमरहस्य ग्रंथाला ४२५ वर्षे पूर्ण; कपिलधारमध्ये पारायण

## ११०० भाविक-भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

बीड

वीरशैव समाजाचे श्रद्धास्थान संतशिरोमणी श्री मन्मथ स्वामी महाराज यांनी लिहिलेल्या परमरहस्य ग्रंथाच्या ४२५ वर्षपूर्तीनिमित्त रविवारी (१ जून) श्रीक्षेत्र कपिलधार येथे सामुदायिक परमरहस्य ग्रंथ पारायण करण्यात आले. यामध्ये राज्यातून आलेल्या ११०० महिला-पुरुष भक्तांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. त्यांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



परमरहस्य ग्रंथ हा वीरशैव लिंगायत परंपरेतील एक अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र ग्रंथ आहे. हा ग्रंथ संतशिरोमणी मन्मथ स्वामी महाराज यांनी लिहिला आहे. यात शिवाचार, शिवसंस्कृती आणि शिवधर्म यांविषयी विस्तृत विवेचन केलेले आहे. वीरशैव-लिंगायत समाजातील लोक या ग्रंथाचे नियमित पारायण करतात. या पवित्र परमरहस्य ग्रंथाच्या ४२५ वर्षपूर्तीनिमित्त गेवराई येथील सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ मिटकरी यांनी श्री ग्रंथराज परमरहस्य पारायण या ग्रुपवर समाजबांधवांना दोन महिन्यांपूर्वी आपापल्या घरी परमरहस्य पारायण करण्याचे आवाहन केले होते. मिटकरी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत पारायणात समाजबांधवांनी सहभाग नोंदवला. याची सांगता श्रीक्षेत्र कपिलधार येथे सामुदायिक पारायणाने झाली. रविवारी सकाळी सहा वाजता बालयोगी राजशेखर शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या हस्ते संतशिरोमणी श्री मन्मथ स्वामी महाराजांच्या संजीवन समाधीस अभिषेक करण्यात आला. यानंतर पंच कमिटीच्या वतीने बाळू मिटकरी, सोमनाथ मिटकरी, उत्तरेश्वर कानडे यांच्या हस्ते कलशपूजन झाले. सकाळी सात ते दुपारी दोन या वेळेत १ हजार १०० भाविकांनी सामुदायिक परमरहस्य पारायणात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. यानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी बालयोगी राजशेखर शिवाचार्य महाराज अहमदपूरकर, काशीनाथ शिवाचार्य महाराज पाथरीकर, डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य महाराज मन्मथधाम मांजरसुंबा आदी शिवाचार्यांचे आशीर्वचन लाभले. पारायण सोहळ्यात बीडसह गेवराई, घाटसावळी, जामखेड, लातूर, औसा, चाकूर, पुणे यासह राज्यभरातून भाविक सहभागी झाले होते.दोन महिने घरीच झाले परमरहस्य ग्रंथ पारायण परमरहस्य ग्रंथ हा संतशिरोमणी मन्मथ स्वामी महाराज यांनी लिहिला असल्याने वीरशैव लिंगायत परंपरेतील एक अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र ग्रंथ मानला जातो. या ग्रंथाचे पारायण समाजबांधवांनी घरी करावे, असे आवाहन सोमनाथ मिटकरी यांनी केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत सर्व समाजबांधवांनी या ग्रंथाचे सलग दोन महिने घरी पारायण केले.

पान एक वरून

**गोपीनाथराव मुंडे गडावरचा**

साजरा केला जाणार आहे. रामायणाचार्य ह.भ.प रामराव महाराज ढोक यांचे कीर्तन व महाप्रसाद असा हा गोपीनाथ मुंडे परिवाराचा पारिवारिक कार्यक्रम आहे.तरी सर्वांनी तीन जून रोजी सकाळी ११ वाजता गोपीनाथ गडावर उपस्थित राहावे असे आवाहन राज्याच्या पर्यावरण तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

**अनिल दादांची गोष्ट**

जबाबदारी ओळखणाऱ्या नेत्याचे भावनिक मनोगत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु आहेत. अशा वेळी रस्त्यांवर भरपावसात भाजी विकणारे, कामावर जाताना मजूर, यांच्यासाठी रेनकोट किंवा छत्र्यांचे वाटप हा एक छोटा प्रयत्न असला, तरी त्यांना दिलासा देणारा हात ठरेल. माझा खरा वाढदिवस तेव्हाच साजरा होईल, जेव्हा गरिबांच्या चेहऱ्यावर तुमच्या मदतीमुळे हास्य उमटेल, असं सांगत अनिलदादांनी शिवसैनिकांना एक नवा विचार देत वाढदिवस गरजावंतांना मदतीचा हात द्या असे आवाहन केले आहे.

**सामाजिक उपक्रमांनी होणार अभिष्टचिंतन!**

अनिलदादांच्या प्रेरणादायी आवाहनाला प्रतिसाद देत, जिल्हाभरातील शिवसैनिक अनिलदादांच्या वाढदिवसावर होणाऱ्या विविध खर्चातून सामाजिक उपक्रम राबवणार आहेत. अनेक ठिकाणी रेनकोट वाटप, अन्नदान, आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिर तसेच विविध समजपयोगी उपक्रमांचे आयोजन शिवसैनिक करणार आहेत

पान सहा वरून

**रखडलेले कामे होणार**

समस्त वरपगाव व ग्रा.पं.च्या वतीने आ.प्रकाशदादा सोळके यांचा सत्कार करताना सरपंच अँड बाबुराव देशमुख, ग्रापसदस्य, इतर गावकरी उपस्थित होते यावेळी शाल श्रीफळ फेटा व श्री . रामकृष्ण महाराज यांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला आहे.

**शेतकऱ्याने संपविले**

कांदा पिकाचे अतोनात नुकसान झाले. त्यामुळे गोविंद आंधळे हे तणावात होते. रविवारी सायंकाळी घरच्यांना घास आणायला शेतात चाललोय. असे सांगून शेताजवळ नदीकडेला असलेल्या करंजीच्या झाडाला साडीने गळफास घेऊन त्यांनी नैराश्यातून जीवन यात्रा संपवली असल्याचे त्यांच्या नातलगाकडून सांगण्यात आले.

**बाजीराव चव्हाणांच्या कार्यालयास**

यांच्या युवासेनेच्या हजारो कार्यकर्त्यांनी मंत्री महोदय यांचे ढोल, ताशे, हार, तुरे, लावून गाजावाजात शिवसेना स्टाईलने मंत्री महोदयांचे स्वागत केले आहे. मंत्री संजयजी राठोड हे बाजीराव चव्हाण यांच्या जनसंपर्क कार्यालय येथे येताच त्यांचे हार तुरे ढोल ताशाच्या गजरात बाजीराव चव्हाण यांच्या शेकडो युवा सैनिकांनी, व सहकाऱ्यांनी त्यांचे जंगी स्वागत केले. यावेळी उपस्थित शिवसेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, युवासेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे युवा नेते सुरज चुंगडे, मा. युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, मा युवासेना जिल्हाप्रमुख अजय सुरवसे, तसेच सर्व शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक, युवासैनिक उपस्थित होते. त्यामुळे त्यांच्या स्वागताची चर्चा संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये चालू आहे.

**सावकाराच्या जाचाला**

आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी सर्जेराव केरू करडुळे याच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकारणी पुढील तपास पोलिस हवालदार एन.बी. सवासे करीत आहेत. पोलिस प्रशासनाने यासारख्या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन गल्लीबोळात फोफावलेल्या खाजगी सावकारांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

**केंद्र,राज्य सरकारमुळे**

त्यासाठी शेतकरी व ओबीसीच्या नेत्यांनी जनतेने केंद्र व राज्यातील सरकारच्या विरोधात प्रचंड मोठे जनआंदोलन उभे करण्याची तयारी करावी. शेतकऱ्याच्या दैनंदिन कुटुंबाचा खर्च भागवणे अडचणीचे झाले आहे. शेती मधील खते बी बियाणे कीटकनाशक औषधी ट्रॅक्टर खर्च खुरपणी फवारणी मळणी यंत्र मजुरी दैनंदिन खर्च वाढल्यामुळे व शेतीमालाचे भाव पाडले, त्यामुळे शेती परवडत नाही .उत्पादनातून खर्च निघणे शक्य नाही, शासनाचे बाजारपेठेवर नियंत्रण नाही. हमीभावापेक्षा कमी भावाने शेतकऱ्याचा शेतीमाल बाजारपेठेतून खरेदी केला जात आहे. शासनाकडून कोणतेही कारवाई नियमानुसार केली जात नाही. शासनाकडून आधारभूत किंमत शेतीमालाला मिळत नाही, बाजारपेठेवर नियंत्रण नाही. शेतकरी व ओबीसी समाजाचा कर्दनकाळ हा केंद्र व राज्य सरकार चे निष्क्रिय धोरण जबाबदार असल्याचा आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला.

**पाण्याचा लोकलढा शेवटच्या**

तांदळा येथे उपोषण सुरू आहे. सोमवारी येथे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी भेट दिली. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना ते म्हणाले, की शिरूर, बीड, गेवराई, वडवणी व माजलगाव तालुक्यातील १४० गावच्या शेतकर्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या भागातील शेतीला धरणाचे पाणी मिळत नसल्याने शेतकऱ्यांसमोर अनेक प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने या भागातील शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी द्यावे, या पाण्यासाठी जो लढा सुरू आहे, हा लढा माझी जबाबदारी असून शेवटच्या श्वासापर्यंत हा लढा लढू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या आंदोलनास सामाजिक कार्यकर्ते दीपक केदार यांनीही भेट दिली. यावेळी बोलताना केदार म्हणाले, की या भागातील शेतीला पाणी मिळाल्यास शेतकर्यांच्या मुलांना स्थलांतर करण्याची वेळ येणार नाही, शेतकर्यांसमोरील प्रश्न सुटतील, या लढ्याची दखल न घेतल्यास आमदारांच्या घरावर मोर्चे काढू, सरकारने हे आंदोलन गांभिर्याने घ्यावे, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी पूजाताई मोरे, ऋषीकेश बेदरे, शेख शफिक, संतोष भारती, गहिणीनाथ महाराज हाकाळे, ओंकार शेंबडे यांनीही विचार व्यक्त केले. यानंतर उपोषणकर्ते अजय पाटील साळुंके यांनी उपचार घेतले.

**सेवानिवृत्तीचा यथोचित**

परळी उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत आहेत. तर दुसरी मुलगी समृध्दी ही बी.ई.शेवटच्या वर्षात शिकत आहे. मुख्य अभियंता सुनिल इंगळे यांच्या हस्ते त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी प्रभारी उप मुख्य अभियंता हिम्मतराव अवचार, कार्यकारी अभियंता सुमीत गायकवाड, अभियंता इंगोले,गजानन नाईक, चैतन्य जाधव,राजू गजले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन के.एच.गिते मॅडम यांनी तर उपस्थित आमचे आभार सहाय्यक कल्याण अधिकारी राठोड यांनी मानले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## भाईंदर स्थानकावर नवे सरकते जिने

**भाईंदर :** भाईंदर रेल्वे स्थानकाच्या पश्चिम बाजूस रेल्वे प्रशासनाने नवे सरकते जिने (एस्केलेटर) उभारले असून, त्यामुळे वयोवृद्ध, दिव्यांग तसेच सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. भाईंदर रेल्वे स्थानकावरून दररोज हजारो प्रवासी ये-जा करतात. त्यामुळे प्रवाशांच्या सोयीसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर रेल्वे प्रशासनाचा भर आहे. त्याअंतर्गत पश्चिम भागात नव्या सरकत्या जिन्याची उभारणी करण्यात आली. नुकतेच हे जिने प्रवाशांच्या वापरासाठी अधिकृतपणे खुले करण्यात आले. यापूर्वी प्रवाशांना जिन्यांने चढ उतार करून प्रवास करावा लागत होता. विशेषतः वयोवृद्ध आणि अपंग प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र, आता प्रवाशांची गैरसोय कमी होणार आहे. हे जिने खासदार नरेश म्हस्के यांच्या खासदार निधीतून उभारण्यात आले असल्याचा दावा करण्यात आला आहे.

# एक धाव वीज सुरक्षेसाठी!

## कल्याण परिमंडलात मॅरेथॉनद्वारे वीज सुरक्षा सप्ताहाचा शुभारंभ

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त 'शून्य अपघात महावितरण, शुन्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन १ ते ६ जून दरम्यान राज्यभरात वीज सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार कल्याण परिमंडलात काल (१ जून) सकाळी मॅरेथॉनच्या उत्साही वातावरणात सुरक्षा सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. 'आम्ही सुरक्षेचे शिल्पकार, शून्य अपघाताने करू महावितरणचे ध्येय साकार' हे ब्रिद घेऊन वीज सुरक्षेबाबत जनजागृती करत निघालेल्या कर्मचारी-अधिकाऱ्याच्या मॅरेथॉनचे नेतृत्व कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी केले.

महावितरणचा २० वा वर्धापन दिन येत्या ६ जूनला साजरा होत आहे. या निमित्ताने आयोजित वीज सुरक्षा सप्ताहात वीज सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत विविध उपक्रम



आयोजित करण्यात आले आहेत. कल्याण परिमंडल कार्यालयाच्या प्रांगणातून रविवारी सकाळी ८ वाजता कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या सहभागातून आयोजित मॅरेथॉनला सुरुवात झाली.

वीज सुरक्षेबाबत फलक हाती घेत व घोषणा देत ही मॅरेथॉन प्रेम ऑटो चौकापर्यंत पोहचली. वीज सुरक्षेचा जागर करत 'रन फॉर सेफ्टी' हे घोषवाक्य घेऊन निघालेल्या मॅरेथॉनचा समारोप परिमंडल कार्यालयाच्या प्रांगणात झाला.

या मॅरेथॉनमध्ये वाशी मंडल कार्यालयाचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील, मुख्यालयातील वितरण विभागाचे अधिक्षक अभियंता नितीन काळे, कल्याण मंडल दोनचे अधिक्षक अभियंता विजय फुंदे, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी अजित ईगतपुरीकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर, कार्यकारी अभियंते कौमुदी परदेशी, देबाशिश दत्ता, मिलींद चौधरी, जगदिश बोडखे, मनिष ढाकरे, वरिष्ठ व्यवस्थापक योगेश अमृतकर यांच्यासह उपविभागीय, शाखा अभियंते, कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आज २ जून रोजी परिमंडलातील सर्वच उपविभागांमध्ये रहिवासी परिसरात वीज सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. तर ३ व ४ जून रोजी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी आणि कुटूंबियांसाठी तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी वीज सुरक्षा विषयी निबंध / चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

# सांभाळा : कोरोना आला दारात!



**विनायक बेटावदकर**
**कल्याण**

पावसाळा नुकताच सुरु होत आहे. पावसाळ्याच्या सुरवातीला हवामानात बदल झाल्याने थंडीताप, पडसे, डोकेदुखी असे किरकोळ आजार अनेकांना होतात. घरगुती उपचार करून आपण ते बरेही करतो. कोरोनाच्या आजाराचीही हीच प्राथमिक लक्षणे असल्याने त्याकडे दुर्लक्ष करू नका, असा सल्ला वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून दिला जात आहे. त्याकडे दुर्लक्ष करू नका. त्याचे पालन करा. आपल्याकडे ठाणे कल्याणमध्ये कोरोनाचे रुग्ण आढळले. ठाणे, कल्याणमध्ये प्रत्येकी एक रुग्ण मृत्यू पावल्याचेही सांगितले जाते. मुंबईत कोरोनाचे ३५ रुग्ण संशयित आढळून आले आहेत.

या सर्व पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेने आपल्या काही रुग्णालयात विशेष कक्ष सुरु केले आहेत. त्या बरोबरच सर्व रुग्णालयातून थंडीताप,कोरोनासाठी लागणाऱ्या विशेष औषधांचा साठाही करून ठेवला आहे. जेथे गरज पडेल तेथे आरोग्य सेवेत वाढ करण्याचीही तयारी ठेवली आहे. मे महिन्यात रुग्णाच्या संख्येत वाढ झाल्याचेही आढळून आले. त्यात अचानक आलेल्या अवकाळी पावसात भिजल्यामुळे थंडी तापाच्या प्रमाणात वाढ झाल्याचेही आढळून आले. साधा भिजल्याचा ताप म्हणून तापाकडे दुर्लक्ष करून चालणारे नाही. ताप अंगावर काढूही नका कारण हा साधा ताप म्हणजेच अनेक प्रकारांच्या आजाराची सुरवात असते. त्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्याकडे (डॉक्टरकडे) जाऊन उपचार घेणे महत्वाचे आहे. मे महिन्यात अवकाळी पावसात भिजल्याने राज्यातील अनेक भागातून तापाच्या रुग्णाची संख्या वाढल्याचे अनुभवाला आले आहे.

ताप आलेल्या रुग्णाला अन्य काही आजार असेल तर त्यांनी त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नये. मुंबई जवळ असलेल्या ठाणे जिल्ह्यात ठाणे महापालिका क्षेत्रात संशयित कोरोना तापाचे आता पर्यंत ७० च्या वर रुग्ण आढळून आले आहेत. कल्याण डोंबिवलीत तर या तापामुळे दोन रुग्ण मरण पावल्याचे आरोग्य अधिकाऱ्यांनी जाहीर केले आहे. थंडीतापाच्या रुग्णांना रुग्णालयात दाखल करून त्यांची कोरोना चाचणी करून घ्यावी अशा सूचना शासनाच्या आरोग्य विभागाने खासगी डॉक्टरांना दिल्या आहेत. राज्यातील महापालिका – पालिकांना सतर्क राहण्यास सांगितले आहे. पावसात ओले झालेल्या व्यक्तीला नेहमी गरम पदार्थ खावेसे वाटतात आणि चटकन गरम मिळणारा पदार्थ म्हणजे रस्त्यावरच्या हातगाड्यांवरची गरमागरम – चटकदार भजी त्यावर गाडीवर असलेले पाणीही पितात. यातून पोटाचे विकार सुरू होतात, अनेकांना अस्वस्थ वाटू लागते, आजारपण येते. आणखी एक गोष्ट सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे केवळ दुषित अन्नामुळे किवा बाहेरचे पदार्थ खाण्यामुळेच आजार होतात किवा कोरोनाला निमंत्रण दिले जाते असे नाही.

अलीकडे स्टीलची भांडी वापरात येत असली तरी अनेक ठिकाणी पितळीची भांडी वापरली जातात. या पितळी भांड्यांना कल्हई केली नसेल तर त्यात ठेवलेले अन्नपदार्थ खराब होतात. असे कळंकलेले अन्न खाण्यात आले तरी पोटाचे विकार होऊन आजारपण येते. अन्न हे परब्रह्म म्हणून आपण उरलेले अन्न खातो. शिळे अन्न पावसाळ्यातच नव्हे तर एरव्हीही खाऊ नये. अन्न ठेवायची भांडी चांगली स्वच्छ असावीत. अन्न फ्रीजमधून काढल्यावर लगेच खाऊ नये. उघडे पदार्थ अजिबातच खाऊ नयेत. अन्न नेहमी गरम करून खावे. अन्नावर माशा, झुरळे, पाखरे (चिलटे) बसणार नाहीत याची काळजी घ्यावी. असे सर्व केल्याने स्वच्छ अन्न पोटात जाईल. पावसाळ्यात अन्नाच्या स्वच्छतेकडे लक्ष द्यावे त्यामुळे आपल्या दाराशी आलेला 'कोरोना' पुन्हा परत जाईल.

## वेचक

### सिडकोच्या देखण्या कलाग्रामची दुरवस्था

**नवी मुंबई :** सिडकोने दोन दशकांपूर्वी कोकण भवन जवळ वसवलेल्या देखण्या अर्बन हाट अर्थात कलाग्रामची दुरवस्था झाली आहे. या अर्बन कलाग्रामच्या सभोवताली असलेल्या संरक्षक भिंती कोसळू लागल्या आहेत. त्यामुळे बेलापूर रेल्वे स्थानक तसेच सिडको मुख्यालय



परिसरकाकडे जाणाऱ्या नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. सिडको मात्र कलाग्रामच्या या दुरवस्थेकडे डोळेझाक करत आहे. नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील जवळजवळ १५ एकर क्षेत्रावर सिडकोने या कलाग्रामची निर्मिती केली आहे. सिडकोने करोनानंतर या कलाग्रामला अक्षरशः टाळे ठोकले आहे. राज्यातील हजारो महिला बचत गट व अनेक हातमाग कामगार यांची ही हक्काची बाजारपेठ होती. याच ठिकाणी दरवर्षी राज्यभरातील महिलांसाठी व कलाकारांसाठी मेळे घेतले जात होते. केंद्र शासन व सिडको यांच्या माध्यमातून निर्माण झालेले हे अर्बन कलाग्राम आता अत्यंत दुर्लक्षित झाले आहे. आता या कलाग्रामची पूर्ण रयाच गेली आहे. सिडकोचे सुरक्षारक्षक या ठिकाणी बसलेले असतात. परंतु कलाग्राममध्ये जाताना मोठमोठे वृक्ष उन्मळून पडलेले दिसतात. विद्युत दिव्यांची दुरवस्था झाली आहे. कारंजे बेट बकाल अवस्थेत आहे. दरम्यान, याबाबत सिडको जनसंपर्क अधिकारी प्रिया रातांबे यांना संपर्क केला असता त्यांनी संबंधित विभागाकडून अधिक माहिती घेण्यात येईल असे सांगितले.

### महिलांसंबंधी गुन्हे प्रकरणात ४८ तासांत दोषारोपपत्र दाखल

**कल्याण :** महिलांच्या संबंधित तीन गुन्ह्यात कल्याण परिमंडळ ३ च्या पोलिसांनी ४८ तासांच्या आत दोषारोपपत्र दाखल केले आहे. कल्याण पूर्व येथील कोळशेवाडी, कल्याण पश्चिम येथील बाजारपेठ



आणि डोंबिवलीतील मानपाडा पोलिसांनी डीसीपी अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी केली आहे. कोणतीही घटना असो पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल दाखल होतो. प्रकरणाचा तपास सुरू होतो. ९० दिवसांच्या आत पोलिसांना तपास करून या प्रकरणातील दोषारोप पत्र कोर्टात दाखल करायचे असते. आरोपीला कठोरात कठोर शिक्षा होईल यासाठी पोलिसांकडे पुरावा गोळा करण्यासाठी ९० दिवसांची वेळ असते कोर्टात आरोप पत्र दाखल झाल्यानंतर पुढील प्रक्रिया सुरू होते. यादरम्यान आरोपींना जामीन देखील मिळून जातो. कल्याण परिमंडळतील पोलिसांनी एक चमकदार कामगिरी केली आहे. कल्याणचे डीसीपी अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांच्या संबंधित गुन्ह्यात ४८तासांच्या आत गुन्हा दाखल करून फक्त आरोपीला अटक नाही. तर कल्याण कोर्टात दोषारोप पत्र देखील दाखल झाले आहे. कल्याणच्या मानपाडा आणि कोळसावाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत तसेच बाजारपेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत झालेल्या महिलांसोबत गैर प्रकाराबद्दल या तीन पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला. या तीन पोलीस स्टेशन मधील तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांनी गुन्हा दाखल केल्यानंतर तपास सुरू केला. महिलांसोबत घडलेल्या प्रकाराच्या सर्व पुरावा गोळा करण्यात आला. आरोपीला कठोर शिक्षा होईल यासाठी कोणत्याही प्रकारची चूक होऊ नये यासाठी पोलिसांनी अहोरात्र काम केले. आणि अखेर ४८ तासांच्या आत कल्याण कोर्टात आरोप पत्र दाखल करण्यात आला आहे.

### निष्पाप बालकांच्या मृत्यूस जबाबदार ठरलेला शाळा चालक अटकेत

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील केबीके इंटरनॅशनल शाळेच्या परिसरात घडलेल्या दुर्घटनेने संपूर्ण शहर हादरले आहे. शाळेमागील अनधिकृत, धोकादायक भिंत कोसळून अंश राजकुमार सिंग या पाचवीच्या विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, आणखी दोन विद्यार्थी गंभीर जखमी झाले आहेत. याबाबत पोलिसांनी तत्काळ कारवाई करत शाळा चालक सुबराव खराडे याला अटक केली असून त्याला तीन जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दुर्घटनाग्रस्त शाळेची ही भिंत कोणत्याही अधिकृत परवानगीशिवाय आणि सुरक्षिततेचे निकष पाळता न बांधल्याचे समोर आले असून , स्थानिक रहिवाशांनी यासंदर्भात वेळोवेळी तक्रारी करूनही शाळा प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले. याच निष्काळजीपणामुळे एका निष्पाप बालकाचा बळी गेला. अंशच्या आई अन्नपूर्णा सिंग यांच्या तक्रारीवरून टिटवाळा पोलिसांनी शाळा चालक सुबराव खराडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. आज त्याला न्यायालयासमोर हजर केले असता त्यांना तीन जून पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## संच मान्यतेच्या निर्णयाने अनुदानित शाळा पडणार बंद

◆ **मुरबाड (वार्ताहर) :**

१५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार सुधारित संचमान्यता आदेश शाळांना ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामुळे अनेक अनुदानित शाळा बंद पडणार असल्याने हा शासन आदेश तातडीने रद्द करून पुर्वीच्याच निकषांनुसार संचमान्यता करण्याची मागणी शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस यांनी शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क या अधिनियमाचा चुकीचा अर्थ काढून प्राथमिक विभागाची संच मान्यता करण्यात आली आहे. त्याचबरोबर माध्यमिक विभागाकरीताही सुधारित निकष लावल्याने अनेक अनुदानित शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असून मोठ्या प्रमाणात शिक्षक अतिरिक्त होणार आहेत. या शिक्षकांना शासन अनुदान देणार की नाही असा प्रश्न समोर येत असून या शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न अधांतरीच राहणार



आहे. त्यामुळे या शिक्षकांवर उपासमारीची वेळ येते की काय असा प्रश्न निर्माण झाल्याने शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. राज्यात शिक्षक भरतीसाठी पवित्र पोर्टल लागू केल्यामुळे अनुदानित शाळांमध्ये हजारो शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शिक्षणावरील खर्च वाचवण्यासाठी शासनाने जागोजागी मुबलक प्रमाणात स्वयंअर्थसहाय्यित शाळा सुरू केल्याने पालक व विद्यार्थी तिकडे आकर्षित होत आहेत. अशा काही कारणांमुळे मराठी माध्यमाच्या अनुदानित शाळांमध्ये विद्यार्थी प्रवेश घेत नाहीत.

> "मराठी माध्यमाच्या शाळांना संजीवनी मिळावी व त्या वाढल्या नाहीत तरी निदान आहेत त्या तरी टिकाव्यात यासाठी शासनाने उच्च न्यायालयाने दिलेल्या २३ एप्रिल व ६ मे २०२४ च्या अंतरिम आदेशाचा संदर्भ देत १५ मार्च २०२४ चा सुधारित संच मान्यता आदेश तातडीने रद्द करावा व पुर्वीप्रमाणेच संच मान्यता आदेश उपलब्ध करून द्यावेत "
> - **सुधीर घागस,** अध्यक्ष-शिक्षण क्रांती संघटना, महाराष्ट्र प्रदेश.

## ज्येष्ठ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी

**कल्याण :** खर्डीकर शैक्षणिक प्रसारक मंडळाच्या वतीने स्पंदन संस्था आणि खर्डीकर शिक्षण प्रसारक मंडळ एनजीओ यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याणमधील राणी लक्ष्मीबाई ज्येष्ठ नागरिक मंडळ येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कल्याण मधील नागरिकांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात या हेतूने हे आरोग्य शिबीर खर्डीकर क्लासेस चे संस्थापक अध्यक्ष डॉ.सुनील खर्डीकर व डॉ. माधुरी कुलकर्णी यांच्या स्पंदन निसर्गोपचार चिकित्सा आणि शिक्षण संस्था यांच्यामार्फत आयोजित करण्यात आले होते. यावेळी मानसोपचार तज्ञ विकास नाईक यांनी देखील आरोग्य तपासणी शिबिरास भेट देत नागरिकांना मार्गदर्शन केले. या शिबिरात सरवाइकल, पोटदुखी, कंबरदुखी, गुडघेदुखी, मानसिक तणाव उपचार, मधुमेह उपचार , ब्लड प्रेशर सारखे आजारांची तपासणी तसेच उपचार करत औषधे वाटप करण्यात आली.

## मे महिन्यात जिल्ह्यात विक्रमी पावसाची नोंद

◆ **बदलापूर (वार्ताहर) :**

यंदाच्या मे महिन्यात सर्वत्र पावसाने हजेरी लावली. ऐरवी धामांच्या धारात निघणारा मे महिना पावसाच्या धारांत गेला. काही ठिकाणी या पावसाने पूरस्थिती निर्माण झाली. नालेसफाईपासून विविध कामांचे पितळ उघडे पडले. अनेक घरांमध्ये पाणी शिरले. मुंबईच्या नव्या मेट्रो मार्गिकेलाच गळती लागली. विजेचा पुरवठा अनेक ठिकाणी खंडीत झाला. उन्हाळी पिकांना याचा मोठा फटका बसला. ठाणे जिल्ह्यातील आंबा शेवटच्या टप्प्यात हाती आलाच नाही. मात्र हा पूर्व मोसमी पाऊस वळव्याच्या पावसापेक्षा अधिकचा होता.

मे महिन्यात सुरूवातीला पश्चिम विक्षोभ आणि त्यानंतर आलेल्या पूर्व मोसमी पावसामुळे कधी नव्हे ते विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. या भागात शासकीय हवामान केंद्र नाही. मात्र खासगी हवामान अभ्यासकांनी केलेल्या नोंदीनुसार गेल्या अनेक दशकांनंतर मे महिन्यात अशा पावसाची नोंद झाली आहे. ठाणे जिल्ह्यात बदलापूर शहरात सर्वाधिक ४९६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. तर मुरबाडचे धसई, उल्हासनगर येथेही सरासरी ३०० मिलीमीटरपेक्षा अधिकचा पाऊस झाला आहे. रायगड जिल्ह्यातल्या पावसामुळे ठाणे जिल्ह्यातल्या उल्हास



नदीला पूर येतो. त्या माथेरान, कर्जत आणि कळंब भागातही सरासरी ५०० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.

यंदाच्या वर्षात पश्चिमी विक्षोभाचा मोठा फटका महाराष्ट्राला आणि विशेषतः ठाणे जिल्ह्याला बसला. पश्चिमी विक्षोभानंतर पूर्व मोसमी पावसाचाही तितकाच फटका बसला. संपूर्ण मे महिना हा पाऊस कोसळला. त्यामुळे कधी नव्हे ते विक्रमी पावसाची नोंद मे महिन्यात झाली. बदलापूर शहरात ऐरवी अधिक पाऊस पडत असतो. मे महिन्यातही हीच परंपरा कायम राहिली. बदलापूर शहरात संपूर्ण मे महिन्यात ४९६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. बदलापुरनंतर नेरूळ ३३७, मुरबाड तालुक्यातील धसई ३००, उल्हासनगर ३१२, अंबरनाथ २८९, मुरबाड २७१, कल्याण २६८, ठाणे २५५, कोपरखैरणे २५३, टिटवाळा २४६, ऐरोली २४०, डोंबिवली २३४, भिवंडी २२२, दिवा २१४ आणि शहापूर येथे १५० मिलीमीटर पावसाची नोंद झाल्याची माहिती खासगी हवामान अभ्यासक अभिजीत मोडक यांनी दिली आहे.

## शहापूरमध्ये सततच्या खंडित वीज पुरवठ्यामुळे व्यापारी संतप्त

◆ **शहापूर (वार्ताहर) :**

गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पावसामुळे शहापूर तालुक्यात वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. सततच्या खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिकांसह व्यापारी आणि लघु उद्योजक त्रस्त झाले आहेत. महावितरण विभागाकडून वारंवार दुरुस्तीचे काम केले जात असतानाही वीज पुरवठा दहा तासाहून अधिक वेळ खंडीत होतो. त्यामुळे संतप्त व्यापाऱ्यांनी महावितरण कंपनीच्या कार्यालयावर धडक देऊन वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली. संतप्त व्यापाऱ्यांच्या या मागणीवर वीज वितरण कंपनीचे अधिकारी ताळ्यावर आले असून वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी लागणाऱ्या यंत्रणा नव्याने लवकरात लवकर उभारण्याचा सकारात्मक निर्णय घेण्यात आला.



यावेळी शहापुरातील रामबाग येथे कमर्शिअल कनेक्शन साठी स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर बसवणे, शहरातील इतर ट्रान्स्फरमर वरील अनावश्यक जादा लोड कमी करणे, ब्राह्मण आळी, खालचा नाका, सावंत विहार, माने नगर तसेच पंडित नाका येथे नव्याने जादा ट्रान्स्फरमर बसविण्यात येणार असून शहरात नवीन केबल टाकणे, येत्या आठ दिवसात उपाययोजना व आवश्यक दुरुस्ती करून वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा नियमित करणे, अपुरा कर्मचारी वर्ग तातडीने भरणे, दुरुस्तीसाठी दुपारी दोन पर्यंतच वीज पुरवठा बंद करणे, ग्राहकांना तक्रार करण्यासाठी एकच इमर्जन्सी संपर्क क्रमांक सुरु करणे आदी निर्णय महावितरणचे उप विभागीय अभियंता यादव इंगळे यांच्या सोबत झालेल्या बैठकीत घेण्यात आले. यावेळी व्यापारी मंडळाचे अध्यक्ष गौरी अग्रवाल, किशोर गुजराथी, सोमनाथ काबाडी, किशोर अग्रवाल, यशवंत गुजरे, विशाल मडके, पंकज पोरवाल, योगेश शहा, जयवंत जोशी यांसह महावितरणचे शहापूर शहर अभियंता आदित्य जोशी व सहाय्यक पांडुरंग खंबायत उपस्थित होते.

## खोल समुद्रातील मासेमारीवर बंदी

**उरण :** पावसाळ्यातील दोन महिन्यांमध्ये खोल समुद्रातील मासेमारीबंदीला सोमवारपासून सुरुवात होत आहे. या संदर्भात शासनाने आदेश जारी केले आहेत. त्यानुसार १ जून ते ३१ जुलै अशा ६१ दिवसांच्या कालावधीसाठी ही बंदी लागू राहील. हा कालावधी मासळीच्या प्रजननासाठी आवश्यक असल्याने ही बंदी घालण्यात येते. त्यामुळे ताजी मासळी कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याने मासळीच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे.

या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रीय जलधि क्षेत्रात यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना मासेमारी करण्यास बंदी घालण्यात येते. या बंदी कालावधीत सागरी कायद्याचा भंग करुन मासेमारी केल्यास बोटींवर कारवाई करण्यात येईल. ही मासेमारी बंदी ही पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणाऱ्या बिगर- यंत्रचालित नौकांना लागू राहणार नाही. त्यामुळे समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सर्व यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौका १ जून २०२५ पूर्वी मासेमारी बंदरात परतणे बंधनकारक आहे. तसेच ३१ जुलै २०२५ वा त्यापूर्वी नौकांना समुद्रात मासेमारीकरीता जाता येणार नाही. राज्याच्या सागरी जलधी क्षेत्राबाहेर (सागरी किनाऱ्यापासुन १२ सागरी मैलापुढे) खोल समुद्रात मासेमारीस जाणाऱ्या नौकांस केंद्र शासनाच्या खोल समुद्रातील मासेमारीच्या धोरणानुसार हे आदेश लागू राहतील.

## विजेच्या धक्क्याने १४ वर्षीय बालकाचा मृत्यू

◆ **बदलापूर (वार्ताहर) :**

बदलापूर गावातील चिंतामणी चौकात अमृत टॉवरमध्ये राहत असलेल्या राजवीर अमृत लोखंडे या १४ वर्षांच्या बालकाचा गार्डनमध्ये खेळत असताना दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. पूर्वी कोपरी गाव, वाशी येथे राहणारे लोखंडे कुटुंबीय हे मागील १५ दिवसांपूर्वी बदलापूर गावातील अमृत टॉवर येथे राहायला आले होते. शनिवारी रात्री अंदाजे ११ ते साडे अकराच्या सुमारास त्याच सोसायटीतील गार्डन मध्ये राजवीर खेळत होता. तेथे असलेल्या पोलच्या वायर ह्या उघड्यावर असल्याचे समजते. तो खेळत असताना याच पोलवर राजवीरचा तोल गेल्याने त्याला वायरचा जोरदार धक्का बसला. त्यानंतर उपचारासाठी त्याला खासगी रुग्णालयात नेण्यात आले. त्यांनी त्याला शासकीय रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिल्याने ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांनी तपासल्यावर त्याला मृत घोषित केले. त्यामुळे संतापलेल्या लोखंडे कुटुंबीय आणि नातेवाईकांनी जोपर्यंत उघड्यावर ठेवलेल्या वायरच्या संबंधितांवर कारवाई होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही असा पवित्रा घेतला मात्र पोलिसांनी मध्यस्थी करून संबंधितांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यावर मृतदेह ताब्यात घेतला.

### ठाणे, पालघर जिल्ह्यांमध्ये १५ ऑगस्टपर्यंत विशेष मोहीम

# निराधार बालकांना मिळणार 'ओळखीचा' अधिकार

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

ठाणे आणि पालघर जिल्ह्यांतील रस्त्यावर राहणाऱ्या, बेघर आणि निराधार बालकांना आता आधार कार्डच्या माध्यमातून ओळख मिळणार आहे. १८ वर्षांखालील या मुलांना अधिकृत ओळख मिळावी, त्यांना शैक्षणिक आणि सामाजिक प्रवाहात आणावं, यासाठी जिल्हा साथी समितीची स्थापना करण्यात आली आहे. ही समिती १५ ऑगस्टपर्यंत विशेष मोहीम राबवणार असून, आधार कार्ड नोंदणीच्या माध्यमातून या बालकांना नवजीवनाची पहिली पायरी



मिळणार आहे. रेल्वे स्थानकांवर, झोपडपट्ट्यांमध्ये, रस्त्यांवर अथवा बाल संगोपन संस्थांमध्ये राहणाऱ्या अनेक बालकांकडे ओळखीचा कोणताही पुरावा नसतो. यामुळे ते शिक्षण, आरोग्य सुविधा आणि कायदेशीर संरक्षणापासून वंचित राहतात. त्यामुळे अशा मुलांना ओळख देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणं गरजेचं आहे. ही गरज लक्षात घेऊन राष्ट्रीय व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणांच्या निर्देशानुसार ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.

ही विशेष मोहीम प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली राबवली जात आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश १८ वर्षांखालील अशा मुलांना ओळख देणं आहे, जे कौटुंबिक आधार, निवारा किंवा संरक्षणापासून वंचित आहेत. यामध्ये रस्त्यावर राहणारी मुले, अनाथ मुले, तस्करीतून मुक्त केलेली बालके, बेघर मुले आणि कुटुंबासोबत पुन्हा एकत्र न झालेली बालके समाविष्ट आहेत. जिल्हा साथी समिती केवळ आधार नोंदणीपुरती मर्यादित नसून, या बालकांना पुढे शैक्षणिक प्रवेश, आरोग्य सेवा, निवारा, सामाजिक समावेश आणि कायदेशीर संरक्षण मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहे. समितीमध्ये जिल्हा शिक्षणाधिकारी, आरोग्य अधिकारी, तहसीलदार, पोलीस अधिकारी, बाल संरक्षण अधिकारी, तसेच शासकीय-अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी सामील आहेत. या उपक्रमामुळे अनेक निराधार बालकांना ओळखीचा हात मिळणार असून, त्यांच्या आयुष्यात परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे.

## केडीएमसी अधिकाऱ्यांकडून पिसवली प्रभागाची पाहणी

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

पिसवली प्रभागातील शिवसेनेचे पदाधिकारी तथा शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष कल्याण ग्रामीण शहरप्रमुख अमित कोळेकर यांच्या पुढाकाराने नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी विकासमय पाहणी दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या पाहणी दौऱ्यात केडीएमसी सहायक आयुक्त भारत पवार व इतर अधिकारी तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

पिसवली प्रभागातील शिवसेनेचे अमित कोळेकर यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे सहा आयुक्त भारत पवार यांची भेट घेऊन प्रभागातील विविध प्रश्नांना वाचा फोडली व प्रभागामध्ये पाहणी दौरा



करण्याचे निवेदन दिले होते. त्याला अनुसरून सहा आयुक्तांनी देखील तात्काळ प्रतिसाद देत नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शनिवारी पिसवली प्रभागामध्ये अमित कोळेकर यांच्या पुढाकाराने पाहणी तथा नागरिकांचे प्रश्न सोडवणूक दौरा पार पडला.

त्यावेळी मोठ्या संख्येने नागरिक रस्त्यावर उतरलेले दिसले. या दौऱ्यामुळे प्रभागातील नागरिकांना एकप्रकारचा दिलासा मिळाला असून, आतापर्यंत कोणीही असा उपक्रम पिसवली प्रभागात राबवला नसून, अमित कोळेकर यांच्या माध्यमातून नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे नेतृत्व उदयास आले आहे असा सूर नागरिकांकडून येताना दिसला.

# पंतप्रधानांचा इशारा अन् पाकिस्तानचा थरकाप

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल लोकमाता अहिल्यादेवी होळकर महिला स्त्रीसशक्तीकरण महासंमेलनात भोपाळ येथे बोलताना पाकिस्तानला इशारा दिला की, ज्यामुळे पाकचा थरकाप व्हावा. कारण मोदी यांच्या धमक्यांमध्ये खरा अर्थ भरलेला असतो आणि त्यात केवळ फुकाच्या वल्गना नसतात. याची पाकसह प्रत्येक शत्रू राष्ट्राला खात्री पटलेली आहे. मोदी म्हणाले की, पाकच्या सैन्याने जर गोळ्या डागल्या तर त्यांना उत्तर हे तोफगोळ्यांनी दिले जाईल. तसेच ऑपरेशन सिंदूर ही भारताची सर्वात मोठी आणि सर्वात यशस्वी कारवाई होती हेही त्यांनी म्हटले. मोदी यांच्या वक्तव्याचा खूप खोल अर्थ दडला आहे आणि तो पाकला बरोबर माहीत आहे. कारण तोफगोळ्यांनी उत्तर देणे म्हणजे पाकचे उरले-सुरले सैन्य खलास करणे आहे आणि जगात सगळीकडे नाचक्की झालेला पाक आता आणखी नाचक्की करून घेऊ इच्छित नाही. पण हे पाकच्या मनावर आहे. मोदी यांनी पाकला इशारा देण्याचा मुहूर्त निवडला तोही खास आहे. कारण लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचा दिन म्हणजे ज्यांनी आपल्या आयुष्यातील सर्व काही लोककल्याणासाठी झोकून दिले आणि त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. तसेच लोकांसाठी जीवनभर त्या झटल्या. त्यांच्या जयंतीचा मुहूर्त साधून मोदी यांनी पाकला हा सज्जड इशारा दिला आहे. त्याला दुसराही अर्थ आहे. तो आहे आताचा भारत हा पूर्वीसारखा पाकला किंवा कुणालाच घाबरून राहणारा नाही. तो अरे ला कारेने उत्तर देतो. तो आता जागृत आहे.

काँग्रेसच्या काळात भारतीय लष्कर आज आहे तसेच ताकदवान होते. पण फरक राज्यकर्त्यांच्या मानसिकतेत होता. राज्यकर्ते तेव्हा अल्पसंख्याकांना काय वाटेल याच चिंतेत असतं. त्यात पाकने अनेक भारतविरोधी कारवाया केल्या पण भारताने कधीही जवाबी कारवाई केली नाही. अगदी मुंबईवर दहशतवाही हल्ला झाला तेव्हाही मनमोहन सिंग यांची पाकवर हल्ला चढवण्याची हिंमत झाली नव्हती. पण आज मोदी यांचे सरकार असल्याने पाकला हे कळून चुकले आहे की, आता भारतात भाजपाचे सरकार आहे आणि ते आपल्या कुरापतींना जशास तसे उत्तर देण्यास समर्थ आहे आणि तसे ते दाखवतातही. कोणत्याही फिजिक्सला महत्त्व असते. नुसती तुमच्याकडे ताकद असून चालत नाही तर ती दाखवण्याची तयारीही असावी लागते. भारताकडे आज ताकद आहे आणि ती दाखवण्याची तयारीही आहे. त्यामुळे पाक नामोहरम झाला आहे. कारण आता बोटचेप्या काँग्रेसचे राज्य नाही तर मोदी यांचे आहे. यातील गुणात्मक फरक पाकला कळून चुकला आहे. मोदी असेही म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर ही भारताने केलेली पाक दहशतवाद्यांविरुद्धची सर्वात मोठी आणि सर्वात यशस्वी कारवाई होती. याचा अर्थ असा आहे की याआधी पाकने अशाच दुष्ट कारवाया केल्या. पण काँग्रेस सरकारमध्ये त्यांना जशास तसे उत्तर देण्याची हिंमत नव्हती आणि त्यांनी ती दाखवलीही नाही. अर्थात याच्या कारणांमागे जाण्याची काही गरज नाही, कारण ते सर्वांना माहीतच आहे. अल्पसंख्याकांच्या लांगूलचालनात काँग्रेस सरकार गुंतले होते आणि त्यामुळे दहशतवाद्यांनी कितीही नृशंस हल्ला केला तरीही कागदी निषेधांचे भेंडोळे नाचवण्यापलीकडे काँग्रेसची धाव कधीच गेली नाही. पण आता मोदी यांनी बुलेटला उत्तर तोफगोळ्यांनी देण्याची भाषा केली आहे आणि तसे करून दाखवले आहे. त्यामुळे पाकच्या पंतप्रधानांना बंकरमध्ये लपून आपला जीव वाचवण्याची वेळ आली होती. त्याशिवाय मोदी यांनी आणखी एक महत्त्वाचा संदेश पाकला दिला आहे तो म्हणजे, टेरोरिझम कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही आणि यापुढे पाकच्या अण्वस्त्रांच्या धमक्यांना भारत घाबरणार नाही. पाकने अण्वस्त्राच्या नसलेल्या, असलेल्या जोरावर भारताला दीर्घकाळ घाबरून ठेवले होते आणि त्याकाळी काँग्रेसला हिंसाचार न करण्याची नशा चढली होती. पण समोरचा जर धमकावत असेल तर त्याला उत्तर त्याला समजेल अशा भाषेत दिले पाहिजे हे सूत्र नव्या भारताने स्वीकारले आहे. ते मोदी यांनी भारताला दिले आहे.

मोदी यांना एका बाबीसाठी मानावे लागेल. ते म्हणजे, मोदी यांनी भारताला आपला मर्दपणा परत मिळवून दिला आहे. याच भाषणात मोदी यांनी महिलांच्या 'ऑपरेशन सिंदूर'मधील सहभागाबद्दल गौरव उद्‍गार काढले आहेत. त्यांनी म्हटले की, 'ऑपरेशन सिंदूर' हे नुसते ऑपरेशन सिंदूर नव्हते तर भारतीय महिलांच्या बळाचा म्हणजे नारीशक्तीचा आविष्कार होता. त्यांचे उद्‍गार शतप्रतिशत खरे आहेत. कारण याच युद्धात भारताच्या जिगरबाज महिलांनी आपल्यातील शुरत्वाचे प्रदर्शन जगाला घडवले. दुसऱ्या महायुद्धात अनेक महिलांनी त्यांच्या अंगातील शौर्याचे प्रदर्शन घडवले होते. त्याच प्रकारचा महिलांच्या कर्तृत्वाचे हे प्रदर्शन होते. मोदी म्हणतात, भारतीय नारी जम्मूपासून पंजाबपर्यंत आघाडीवर राहिल्या आणि त्यांनी असामान्य शौर्य गाजवले. त्यामुळे मोदी यांचे रास्त उद्‍गार कुणालाही पटण्यासारखे आहेत.

पंतप्रधान मोदी यांनी भारतीय महिलांच्या धैर्याबद्दल देशवासीयांना वाटणारा वाढता विश्वास व्यक्त केला आहे. लष्कराच्या तिन्ही दलात भारतीय महिला आघाडीवर राहून भारताची सेवा करत आहेत. याचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. या महिलांनी असामान्य शौर्य दाखवले आहे. अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मजयंतीनिमित्त मोदी यांच्यासारख्या देशभक्ताने त्यांना यापेक्षा जास्त चांगली श्रद्धांजली वाहणे शक्य नाही. मोदी यांच्या भाषणाने पाकचा थरकाप उडाला असेल तर त्याला भारताचा नाईलाज आहे. कारण पाकच्या करतुती तशाच आहेत, त्यामुळे पाकला कधी ना कधी हे भोगावेच लागणार होते. पण काँग्रेसच्या काळात तो निवांत होता. कारण काँग्रेसचे सरकारला केवळ मतांची लाचारी करण्यापासून फुरसत नव्हती. पण आज भाजपा सत्तेत आहे आणि ती सत्ताही भारतीयांच्या सुखासाठी राबवली जात आहे. त्यामुळे पाकचा जळफळाट होत आहे.

# भाजपाची स्वबळाची चाचपणी



भारतीय जनता पार्टीसाठी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या शतप्रतिशत अत्यंत महत्त्वाच्या आहेत. २०१४ आणि २०१९ आणि त्यानंतर सलग तिसऱ्यांदा २०२४च्या विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपाला राज्यात अभूतपूर्व आणि घसघशीत असे यश मिळाल्यापासून भाजपाचे मनोबल कमालीचे उंचावले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या भाजपासारख्या केडरबेस पक्षासाठी त्याचप्रमाणे पक्ष संघटनेचे स्थानिक पातळीवर अधिक बळकटीकरण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात. राजकीय पक्षांचे कार्यकर्ते हे पाच, दहा आणि काही तर अगदी पंधरा-वीस वर्षे देखील स्थानिक पातळीवर निवडणूक लढवण्याची संधी मिळवण्यासाठी कष्ट करतात. लोकसभा, विधानसभा तसेच अन्य निवडणुकांमध्ये स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांच्या बळावरच राजकीय पक्षांना देशात आणि राज्यात सत्ता प्राप्त करता येत असते. त्यामुळे स्थानिक पातळीवरील कार्यकर्ता जेवढा भक्कम तेवढे त्या राजकीय पक्षाचे देशातील आणि राज्यातील सत्तेचे स्थान हे अधिक भक्कम होत असते.

राज्यात आगामी चार ते सहा महिन्यांच्या काळात महापालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषदा पंचायत समित्या अशा जवळपास सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक, ठाणे, नवी मुंबई, कल्याण, डोंबिवली, वसई-विरार, मीरा-भाईंदर, कोल्हापूर, सांगली तसेच विदर्भातील अन्य महापालिका या स्वतःकडे राखणे ही भाजपासारख्या राष्ट्रीय पक्षावर देखील मोठी जबाबदारी आहे. वास्तविक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या राष्ट्रीय पक्ष फार गांभीर्याने लढत नसत. काँग्रेस जेव्हा देशात आणि राज्यात सत्तेवर होती तोपर्यंत मुंबई महापालिकेच्या निवडणुका असो की अन्य कोणत्याही मोठ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असो काँग्रेस नेतृत्वाने त्या अटीतटीच्या म्हणून कधीच लढल्या नाहीत. याचा जो लाभ असायचा तो साहजिकच विरोधी पक्षांना मिळायचा. त्यामुळे काँग्रेस राजवटीत देशात आणि राज्यात जरी काँग्रेस आघाडीचे सरकार असले तरी मुंबई महापालिका असो की ठाणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर यासारख्या महापालिकांमध्ये मात्र तत्कालीन विरोधी पक्ष शिवसेना भाजपा हेच या महापालिकांवर सत्ता काबीज करायचे. त्यावेळी एकसंध शिवसेना त्याचप्रमाणे त्या पाठोपाठ भाजपा हे राज्यातील काँग्रेसला पर्यायी राजकीय पक्ष म्हणून उभे राहत होते. मराठी अस्मिता जपणारा पक्ष म्हणून एकसंध शिवसेनेचे मोठे आव्हान हे त्या काळात काँग्रेस समोर होते. शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे हे तर नेहमी म्हणायचे दिल्ली तुमची, मुंबई आमची. तो काळ हा साधारणपणे राष्ट्रीय राजकारणात तसेच राज्यस्तरीय राजकारणात युती आणि आघाड्या यांचा काळ होता. त्यामुळे राजकीय तडजोडी करतच राष्ट्रीय पक्षांना आणि त्याचबरोबर प्रादेशिक पक्षांना देखील वाटचाल करावी लागत असे. काँग्रेसवर याबाबतीत सातत्याने एक आरोप होत आला की शिवसेनेने राष्ट्रीय राजकारणात आणि त्या खालोखाल महाराष्ट्रातील सत्तेत फारसे स्वारस्य दाखवू नये यासाठी शिवसेनेला मुंबई, ठाण्यापुरते महापालिकांच्या माध्यमातून व्यस्त ठेवण्यात आले आणि १९९५ पूर्वी आणि त्यानंतर १९९९ नंतर मुंबई, ठाणे, नाशिक आणि छत्रपती संभाजी नगर या महापालिका जर लक्षात घेतल्या तर या महापालिकांवर एकसंध शिवसेनेचे आणि त्याचबरोबरीने युतीतला मित्रपक्ष म्हणून भाजपाचे प्राबल्य असायचे. ज्याप्रमाणे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही सत्ताधारी पक्ष मुंबई महापालिकेच्या निवडणुका या शिवसेनेकरता सोडून द्यायचे त्याचप्रमाणे भाजपासारखा राष्ट्रीय पक्ष देखील शिवसेनेच्या हट्टा खातर महापालिका निवडणुकांमध्ये बऱ्याचवेळा दोन पावलं मागे घेत युतीसाठी नरमाईची भूमिका घेत असलेला आजवर पाहण्यात आलेला आहे. याचे अगदी टोकाचे उदाहरण द्यायचे झाले तर १९९५ साली शिवसेनेचे ठाणे जिल्हाप्रमुख स्वर्गीय आनंद दिघे यांनी ठाणे लोकसभा मतदारसंघ हा भाजपाकडून शिवसेनेकडे घेण्यासाठी सर्व प्रतिष्ठा पणाला लावली होती. आनंद दिघे यांच्यामुळे शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी देखील ठाणे लोकसभेवरून भाजपा समोर मोठा पेच निर्माण केला. अखेरीस शिवसेनेच्या हट्टासमोर भाजपा नेत्यांना झुकावे लागले आणि ठाण्यासारखा भाजपाचा परंपरागत लोकसभा मतदारसंघ हा शिवसेनेकरता सोडावा लागला.

## महाराष्ट्रनामा

अगदी काही वर्षांपूर्वीचे म्हणजे २०१७ची मुंबई महापालिकेची निवडणूक जर लक्षात घेतली तर त्यावेळी देखील तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एक संघ शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे त्या काळात मैत्रीपूर्ण संबंध होते. या मैत्रीपूर्ण संबंधांमुळेच शिवसेना आणि भाजपा हे मुंबई महापालिकेच्या निवडणुका जरी स्वतंत्र लढले असले तरी देखील निवडणुकीनंतर या दोन्ही पक्षांमध्ये केवळ दोन जागांचे अंतर होते. राज्यात भाजपा सत्तेवर होता आणि केंद्रामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भक्कम सरकार होते. भाजपा नेतृत्वाने मनात आणले असते तर त्यावेळी शिवसेनेच्या दोन जागा जरी अधिक निवडून आल्या असल्या तरी देखील अन्य पक्षांच्या नगरसेवकांची फोडाफोडी करून भाजपाला स्वतःचा महापौर मुंबईवर सहज बसवता आला असता. मात्र युती धर्म पाळणाऱ्या भाजपाने आणि विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावेळेला समंजसपणा दाखवत मुंबई महापालिकेतील सत्ता ही शिवसेनेकरता सोडून दिली. हे सर्व सांगण्याचे प्रमुख कारण म्हणजे आताच्या २०२५च्या मुंबईसह राज्यात होणाऱ्या महापालिका निवडणुका या अत्यंत वेगळ्या राजकीय परिस्थितीत होत आहेत. भाजपा हा देशातील सर्वात बलवान आणि शक्तिशाली पक्ष म्हणून आज सर्वच राजकीय पक्षांच्या समोर उभा ठाकला आहे. २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपा जरी महायुतीमध्ये लढला असला तरी भाजपाला तब्बल १३२ आमदार हे स्वतःचे निवडून आणता आले आहेत आणि त्यात जर अपक्षांची जोड लक्षात घेतली तर भाजपाची स्वतःची आमदारांची संख्या ही आत्ताच्या घडीला १४०च्या आसपास जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जर ही विजयी घोडदौड लक्षात घेतली तर महाराष्ट्रातील भाजपाची सत्ता अबाधित राखण्यासाठी भाजपाला २०२९पर्यंत तरी ना शिवसेनेची गरज आहे, ना अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची गरज आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी ह्या दोन्ही पक्षांच्या पाठबळाशिवाय देखील भाजपा महाराष्ट्रामध्ये स्वबळावर सत्तेत राहू शकतो याची पूर्ण जाणीव आणि कल्पना राज्यातील आणि केंद्रातील भाजपा नेतृत्वाला आहे.

२०१४, २०१९ आणि २०२४ या गेल्या पंधरा वर्षांतील देशातील आणि राज्यातील झपाट्याने बदललेल्या राजकीय परिस्थितीनंतर भाजपा नेतृत्वाच्या हे लक्षात आले आहे की एकसंध शिवसेना असो की एकनाथ शिंदे यांची शिवसेना असो भाजपाच्या वाढलेल्या ताकदीचा मोठा लाभ हा आजवर शिवसेनेने घेतलेला आहे. उद्धव ठाकरे यांचे सरकार पाडण्यासाठी त्यावेळी एकनाथ शिंदे यांनी जी काही जोखीम पत्करली त्याचे बक्षीस म्हणून एकनाथ शिंदे यांना राज्याचे मुख्यमंत्री केले. भाजपाच्या शिवसेनेपेक्षा दुप्पट जागा असतानादेखील भाजपा नेत्यांनी एकनाथ शिंदे यांच्या हाती राज्याची सत्ता सोपवली. त्यानंतर २०२४मध्ये झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये देखील एकनाथ शिंदे यांचे हट्ट हे भाजपाने पुरवले. तर २०१९मध्ये उद्धव ठाकरे यांनी युतीमध्ये लढून भाजपाकडून मिळणारे सर्व लाभ तर घेतले मात्र सत्तेच्या लालसेपायी काँग्रेस राष्ट्रवादीच्या वळचळणीला ते लागले. अशा परिस्थितीत जर का महाराष्ट्राला भाजपाचे स्वबळाचे भक्कम सरकार २०२९ ला द्यायचे असेल तर त्याची पूर्वतयारी ही आत्ताच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आहे हे भाजपा नेत्यांच्या लक्षात आले. त्यामुळेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असोत की मुंबई भाजपाध्यक्ष आणि सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार असोत की अगदी भाजपाचे शीर्षस्थ नेतृत्व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा असो भाजपाकडून स्वबळाची जी चाचपणी केली जाते आहे ती याचसाठी की स्थानिक ग्रामपंचायतीपासून ते अगदी पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद, महापालिका अशा सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपाला किमान निवडणुका तरी स्वबळावर लढवण्याची इच्छा आहे. स्वबळावर निवडणुका लढवून कितपत यश मिळेल न मिळेल हे तर निवडणुकांचे निकाल सांगतील. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकांनंतर युती म्हणून एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीलाच प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जर याबाबतची गेल्या काही दिवसांमधली विधाने लक्षात घेतली तर निवडणुकेनंतर महायुती म्हणून शिवसेना आणि राष्ट्रवादीशी गरजेनुसार युती होऊ शकेल. मात्र भाजपाच्या चढत्या राजकीय आलेखाचा लाभ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपुरता तरी अन्य कोणत्याही राजकीय पक्षांना यापुढे मिळू देण्यास भाजपा नेतृत्व फारसे स्वारस्य राखत नाही असाच भाजपाच्या नेत्यांच्या स्वबळाच्या चाचणीचा मथितार्थ आहे.

**- सुनील जावडेकर**

# बेस्टला पुनर्वैभव प्राप्त होण्याचे संकेत




मागील लेखात म्हटल्याप्रमाणे खासदार नारायण राणे यांनी बेस्ट महाव्यवस्थापकांची भेट घेतल्यानंतर बेस्टमधील बरेच प्रश्न आता हळूहळू सुटू लागले आहेत, त्यात विशेष म्हणजे निवृत्त कर्मचाऱ्यांचा विषय तसेच बेस्टला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी स्व उत्पन्नाचा मार्ग याचा समावेश होता. साल २०१७ सालापासून बेस्टचे तिकीटभाडे हे पाच ते सहा रुपये होते. बेस्टची भाडेवाढ होत नसल्याकारणाने बेस्ट आर्थिकदृष्ट्या डबघाईला आली होती. याचा परिणाम म्हणून बेस्टच्या बसगाड्यांची दुरुस्ती होत नव्हती, तसेच दैनंदिन खर्चासाठी बेस्टकडे पैसे शिल्लक राहत नव्हते म्हणून नागरिकांना बेस्टकडून पुरेशी सुविधा उपलब्ध होत नव्हती, त्यामुळे थोडीफार का होईना बेस्टभाडे वाढ होणे आवश्यक बनले होते. त्याचाच परिणाम म्हणून २७ एप्रिल रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार यांच्या नेतृत्वात सह्याद्री अतिथिगृह येथे बेस्ट उपक्रमाबाबत आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत बेस्टचे महाव्यवस्थापक श्रीनिवासन व महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते. यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बेस्ट भाडेवाढीसंबंधित विषय आला होता. बेस्ट भाडेवाढ होणे आवश्यकच होते तर ती काळाची गरज बनली होती. यात बेस्टने हा विषय पुढे आणल्याने बेस्टचे तिकीट भाडेवाढ करण्यास मंजुरी दिली व काही दिवसांत ती लागूही करण्यात आली.

आता बेस्ट बस भाडेवाडीमुळे बेस्टच्या तिजोरीत अंदाजे वार्षिक ६०० कोटी रुपये जमा होतील. यामुळे बेस्टला थोडीफार आर्थिक मदत होईल. समर्थ बेस्ट कामगार संघटनेचे सरचिटणीस विलास पवार यांनी पुढाकार घेऊन खासदार नारायण राणे यांना बेस्टची सध्याची डबघाईला आलेली आर्थिक परिस्थिती कथन केली व बेस्ट वाचवण्यासाठी साकडे घातले. बेस्ट हा सन्माननीय नारायण राणे यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असल्याने व बेस्ट वाचावी व मुंबईकरांना पूर्वीसारखाच स्वस्त व सुरक्षित प्रवास मिळावा यासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन व आश्वासित केल्याप्रमाणे दहा दिवसांत आढावा बैठक घडवून आणली व बेस्टला आर्थिकदृष्ट्या प्रबळ करण्यासाठी सार्थक प्रयत्न केले व करत आहेत. यासाठी राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडून आर्थिक मदत मिळून देणार अशीही ग्वाही त्यांनी दिली आहे. त्यांच्या प्रयत्नाला यश हे बेस्ट तिकीट भाडेवाढीला महापालिका आयुक्तांनी मंजुरी दिली यातून दिसून येते. परंतु शिवसेना उबाठा पक्षाचे नेते या भाडेवाढीला विरोध दर्शवित आहेत. त्यांच्या सत्ताकाळात खासगीकरण बेस्टमध्ये आणून बेस्ट उपक्रमाची दुर्दशा केली गेली. बेस्ट खासगी बस वाहतूक करणारे ठेकेदार कंपन्या आणून बेस्ट उपक्रम अधिक तोट्यात आणला गेला तसेच यापूर्वी तीन ठेकेदार कंपन्या तोट्यात गेल्यामुळे बेस्ट उपक्रमाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान करून पळून गेल्या आहेत याचे खापरही उबाठा सरकारवर जाते.

या खासगी बसवरील चालक यांना कोणत्याही प्रकारचे वाहन चालवण्याचे प्रशिक्षण दिले जात नाही. हे बसचालक पैसे कमवण्यासाठी डबल ड्युटी करतात. त्यामुळे त्यांच्या झोपेवर परिणाम होऊन अपघाताचे प्रमाण वाढते. गेल्या काही महिन्यांत खासगी बस चालकाने निष्पाप नागरिक पादचारांचे बळी घेतले आहेत. कुर्ला येथील घटना आजही ऐकली तरी अंगावर शहारे येतात. अजूनही बळी घेण्याची मालिका सुरूच आहे. बेस्टमधून खासगी कंत्राटी पद्धत कायमची बंद करावी अशी समर्थ बेस्ट कामगार संघटना सातत्याने मागणी करत आहे. तसेच विद्युत पुरवठा विभागातही कंत्राटी पद्धत आणून वीज ग्राहकांना चांगली सुविधा मिळत नसून त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. दर महिन्याला मोठ्या प्रमाणात कर्मचारी सेवानिवृत्त होत आहे. काल १ जूनपासून कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या जागी नवीन भरती होत नाही. गेली अनेक वर्षे आर्थिक कारणामुळे कामगार भरती प्रक्रिया होत नाही. याचा परिणाम होऊन इतर कामगार कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कामाचा ताण पडतो. यामुळे सेवक वर्गावर शारीरिक, मानसिक ताण येतो. त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे हृदयविकार, रक्तदाब, मधुमेह, ब्रेनस्टोक, पॅरालिसिस यांसारख्या दुर्धर आजाराला कर्मचारी बळी पडत आहेत.

## मुंबई डॉट कॉम

बेस्टची सध्याची अवस्था 'आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय' अशी झाली आहे. याला सर्वस्वी गेली तीस वर्षे ज्याची सत्ता बेस्टमध्ये व महानगरपालिकेत होती ते जबाबदार आहेत. बेस्टमध्ये संपूर्ण मराठी कर्मचारी होता मात्र गेली तीस वर्षे आर्थिक सत्ता उपभोगलेल्यांनी त्याकडे संपूर्णपणे दुर्लक्ष केले. बेस्ट कर्मचाऱ्यांच्या वसाहती हा एक वेगळा विषय ठरू शकतो, त्याकडे हेतूपुरस्सर दुर्लक्ष केले गेले. त्यामुळे साहजिकच हजारो बेस्ट कामगार हे मुंबईत स्वतःचे घर नसल्याने मुंबई बाहेर फेकले गेले. मुंबईतील बस आगारात काम करण्यासाठी त्यांना दूरवरून रेल्वे प्रवास करावा लागतो. तिथून येऊन काम करणे म्हणजे हे खूपच कष्टदायक आहे. त्यात बेस्टमध्ये मिळणारे वेतन, बेस्टमध्ये न होणारी वेतनवाढ तसेच इतर सुविधांचा अभाव असल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नैराश्याचे वातावरण आहे व मराठीचा कैवारी घेणाऱ्या पक्षाने बेस्ट कर्मचाऱ्यांना अक्षरशः वाऱ्यावर सोडले हीच जर मराठी माणसे मुंबईत टिकली असती तर मुंबईतला मराठी टक्का नक्कीच वाचला असता मात्र फक्त बेस्टकडे एक टक्केवारीचे साधन म्हणून पाहिल्यामुळेच आज बेस्टची अशी दुर्दशा झाली आहे.

**- अल्पेश म्हात्रे**

## राशिभविष्य

सोमवार, २ जून २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती ज्येष्ठ शुद्ध सप्तमी शके १९४७, चंद्र नक्षत्र मघा, योग व्यघात चंद्र राशी सिंह. सोमवार, दि. २ जून २०२५. सूर्योदय ६.००, सूर्यास्त ७.१२, चंद्रोदय ११.५४, चंद्रास्त ००.४८ उद्याची. राहू काळ ७.३९ ते ९.१८, झाशीची राणी लक्ष्मीबाई पुण्यतिथी-तिथीप्रमाणे, शाबूओथ-ज्यू. शुभ दिवस-रात्री ८.३४ पर्यंत.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : शुभग्रहांचे भ्रमण आपणास क्रियाशील ठेवणार आहे.

**वृषभ** : आपले कामाचे नियोजन विचारपूर्वक करणे आवश्यक आहे.

**मिथुन** : नोकरीमध्ये सुवार्ता कळतील त्यामुळे आपला उत्साह वाढणार आहे.

**कर्क** : निराशेची छाया जाणवेल. वादविवादाचे प्रसंग टाळलेलेच बरे.

**सिंह** : योजलेली कामे नीटपणे व सुरळीतपणे होतील.

**कन्या** : काम करताना मानसिकता द्विधा असेल.

**तूळ** : आपल्या कष्टांना यश येणार आहे.

**वृश्चिक** : जमाखर्चाचे व्यवहार आपण संतुलित ठेवणार आहात.

**धनू** : आपल्या बुद्धिचातुर्याने व व्यवहार कुशलतेने आपली कामे यशस्वी होतील.

**मकर** : आर्थिक प्रश्न राहणार नाहीत.

**कुंभ** : आपले कामांमध्ये सातत्य राहणार आहे.

**मीन** : आपल्याला आपल्या कामात जास्त लक्ष घालावे लागणार आहे.

## जनसंवाद

### लाडकी बहीण योजना गावातच हवी

महाराष्ट्रातील गरीब व गरजू महिलांसाठी लाडकी बहीण योजना सरकारने आणलेली असून या योजनेच्या माध्यमातून पात्र असलेल्या महिलांना दर महिन्याला दीड हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. या योजनेसाठी अर्ज करणाऱ्या महिलेच्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपर्यंत असावे आणि तिच्या नावावर घर किंवा वाहन नसावे ही एक महत्त्वाची अट आहे. पण सुरुवातीलाच बऱ्याच अटी शिथिल केल्याने या योजनेच्या लाभार्थींच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आणि योजना लोकप्रिय ठरली. विरोधकांच्या वाढत्या विरोधामुळे सरकारने लाभार्थींची पडताळणी करण्याचे काम हातात घेतले आणि सरकारला आता धक्का बसला आहे. कारण महिला सरकारी कर्मचाऱ्यांनी देखील या योजनेचा लाभ घेतला आहे. साधारणपणे आयकर भरणारे प्रामाणिक करदाते आणि शासकीय कर्मचारी यांच्यासाठी कोणतीही व कुठलीही योजना सरकार दरबारी आणली जात नाही. लाडकी बहीण योजना चालू ठेवण्यासाठी सरकारला दुसऱ्या खात्याचा निधी वळवावा लागत आहे. तसेच सरकारचा हेतू शुद्ध असल्यामुळे सरकारने शहरी भागाऐवजी फक्त ग्रामीण भागातील लाडक्या बहिणींसाठीच ही अभिनव योजना असायला हवी होती, असे वाटते.

**- संजय साळगांवकर,** मुंबई

### वैष्णवी मानसिकतेचा बळी?

दुसरीकडे देशातील नवविवाहित तरुणींचा मानसिक छळ होतो आहे. तिच्याकडे सासरच्यांकडून सतत पैसा, आलिशान गाडी, घरातील उच्च दर्जाची उपकरणे, सोने, चांदी दागिने इत्यादींबद्दल मागणी वाढते आहे. घरात आलेली 'सून' श्रीमंती वाढवण्यासाठी आणलेली आहे हे त्यांच्या वर्तणुकीतून दिसून येते. वैष्णवी हगवणे दोन्हीकडची कुटुंबे आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत, असे असताना जावई, सासरे पैशांची सतत मागणी करतात. ही विकृती संविधानातील सुधारित कलमांची अंमलबजावणी करून रोखावी लागेल. मौजमजा करण्यासाठी पत्नीच्या घरच्यांनी कायम पैसा पुरवावा हे कोणत्या पुस्तकात लिहिले आहे? विवाहित तरुणी जीवन संपवत आहेत. देशाला, महाराष्ट्राला अशा घटना बऱ्याच मागे घेऊन जातात. वैष्णवी प्रकरण मीडियाने पुढे आणले म्हणून आक्रोश लोकांपर्यंत पोहोचला. घरगुती हिंसाचारावर नियंत्रण ठेवणारा आणि हुंडाबंदी करणारा कायदा असला तरी अशा कायद्याचे भय संबंधितांना नाही हेच या घटनांवरून दिसून येते. एकूणच विवाहितांना कायद्याचे संरक्षण मिळावे. भारताच्या सरन्यायाधीशांनीच समाजातील पारंपरिक मानसिकतेवर भाष्य करून समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा कायम मोडीत काढाव्या अशी नम्र विनंती.

**- महादेव गोळवसकर,** कुर्ला

### किती लढाऊ विमाने पाडली?

ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारतीय सैन्याची ६ लढाऊ विमाने पाडल्याचा दावा पाकिस्तानकडून करण्यात आला होता. ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्ताननं केलेले दावे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान यांनी फेटाळून लावले. पाकिस्तानसोबत नुकत्याच झालेल्या लष्करी संघर्षा दरम्यान विमानाचे नुकसान झाल्याची कबुली चौहान यांनी दिली. पण किती विमानांचे नुकसान झाले याबद्दल का सांगत नाही? पाकिस्तान व भारत लष्करी संघर्षादरम्यान भारताचे किती नुकसान झाले ते संरक्षण खाते का जाहीर करत नाहीत? लष्करी संघर्षादरम्यान झालेले नुकसान जाहीर करत नसल्याने पाकिस्तान आपल्या शौर्याबद्दल वाढवून सांगत आहे. युद्धात नुकसान होतेच. युद्धात काही चुका झाल्याने नुकसान झाले असेल. आपण आपले ठरवलेले उद्दिष्ट साध्य केले आहे आणि आपले सर्व वैमानिक घरी परतले आहेत याचा अर्थ आपले एकही विमान पाकिस्तानने पाडलेले नाही, हे सिद्ध होते. चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल यांनी युद्धात भारताचे खरे किती नुकसान झाले ते सांगून पाकिस्तानचा दावा खोडून काढावा.

**- विवेक तवटे,** कळवा

### 'हुंडाबळी' एक गंभीर सामाजिक समस्या

भारतीय संस्कृतीचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक आणि धार्मिक अधिष्ठान असलेली विवाहसंस्था होय. दाम्पत्याचा यशस्वी आणि सुखी विवाह हा प्रामुख्याने प्रेम आणि विश्वास या दोन घटकांवर आधारित असतो आणि त्यामुळेच नातेसंबंध अधिक दृढ होतात. मात्र या विवाहसंस्थेला डळमळीत करणाऱ्या अनेक अनिष्ट व समाजविघातक अशा कुप्रथा आणि परंपरा आजच्या घडीला भारतीय समाज व्यवस्थेमध्ये अस्तित्वात आहेत. त्यापैकीच एक घातक प्रथा म्हणजे हुंड्याची प्रथा आहे. वास्तविक पूर्वीच्या काळात लग्न होऊन सासरी जाणाऱ्या मुलीच्या सुखासाठी मुलीच्या पालकांकडून स्वेच्छेने रोख किंवा वस्तूंच्या स्वरूपात भेटवस्तू दिल्या जायच्या; परंतु काळाच्या ओघात मुलीच्या पालकांकडून स्वेच्छेने नव्हे तर जबरदस्तीने मागण्याची हुंड्याची कुप्रथा सुरू झाली. ही मागणी पूर्ण न झाल्यास वधूला आणि तिच्या कुटुंबाला भयानक त्रास दिला जातो. काहीवेळा या त्रासामुळे त्याची परिणती त्या नववधूचा मृत्यू होण्यात होते. वैष्णवी हगवणेचा हुंडाबळी ही ताजी दुर्घटना. राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो (एनसीआरबी)च्या आकडेवारीनुसार २०२२ मध्ये भारतात हुंडासंबंधित मृत्यूच्या ६४५० घटना घडल्या. यावरून हुंड्याची प्रथा किती अमानवी आहे आणि भारतीय समाजात किती खोलवर रुजली आहे हे अधोरेखित होते.

**- प्रदीप मोरे,** अंधेरी

### स्वनिर्मित शस्त्रांमुळे घडले स्वराज्य !

हिंदूंच्या देवी-देवतांच्या हातात शस्त्र असतात. अधर्माचा नाश आणि धर्माचे रक्षण करण्यासाठी त्यांनी शस्त्र धारण केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी देखील ब्राह्मतेज आणि क्षात्रतेजाच्या बळावर हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. क्षात्रतेज म्हणजेच शिवाजी महाराजांची युद्धनीती आणि युद्धकौशल्य. युद्धासाठी त्यांनी निपुणतेने वापरलेली विविध शस्त्रे, ज्यामुळे त्यांनी शत्रूंना जेरीस आणले आणि पराभूत केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी युद्धात वापरलेल्या शस्त्रांची प्रदर्शनी पाहण्याचा योग 'सनातन शंखनाद महोत्सवा'च्या माध्यमातून आला. त्या काळातील स्वनिर्मित शस्त्र, ज्यांच्या बळावर महाराजांनी शत्रूचा नाश केला, ती पाहून महाराजांबद्दलचा अभिमान शतपटीने वाढला. दुर्दैवाने, आजच्या मुलांच्या इतिहासाच्या पुस्तकात मात्र ही माहिती कुठेही दिलेली नाही. तेव्हा प्रकर्षाने जाणवले की, हिंदवी स्वराज्य ज्याच्या बळावर उभे राहिले, ती स्वनिर्मित शस्त्रे कशी होती, याची माहिती इतिहासाच्या पुस्तकात समाविष्ट होणे आवश्यक आहे. या माध्यमातून भावी पिढीत राष्ट्रप्रेम आणि स्वधर्मप्रेम निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल आणि महाराजांना अपेक्षित असलेले स्वराज्य पुन्हा एकदा साकार होईल.

**- प्रिया बागडदेव,** छिंदवाडा

# 'स्वतःवर विश्वास ठेवा'



आनंदी पालकत्व

डॉ. स्वाती गानू



पालकांनो तुमच्या मुलांना परफेक्ट बनवण्याचा आग्रह करण्यापेक्षा त्यांना फक्त मी यापेक्षा आणखी थोडे चांगले करू शकतो हे माहीत करून द्या. यासाठीचे जे प्रयत्न मुलं करतील हे जास्त मोलाचे ठरतील. त्यातून काय साध्य होईल तर प्रयत्न करण्याचे, अपयश येत असतानाही पुन्हा उठून उभे राहण्याचे धैर्य निर्माण होईल. काम करताना, अभ्यास करताना, खेळताना, कलेचा रियाझ करताना, कामात प्रयत्न करताना आपले नेमके कुठे चुकतंय हे शोधून काढण्यासाठी मुलं आपल्या मेंदूच्या मदतीने विचार करायला लागतील. त्यांचे मन त्यांना धीर देईल, हृदय त्यांच्याशी हितगुज करेल की, तुला थांबायचे नाहीय. प्रयत्न सोडायचे नाहीत. काम करतच राहायचे आहे. माघार घ्यायची नाहीय.

मुलं यशस्वी होईपर्यंत, आपल्या ध्येयाजवळ जाऊन पोहोचेपर्यंत तुमचा विश्वास त्यांना 'उसना' द्या. हा तुमचा विश्वास मुलं डोळ्यांत जेव्हा पाहतात ना की 'मी हे करू शकतेय' असा विश्वास जर माझ्या आई-वडिलांना वाटतोय, तर ते नक्कीच खरं आहे. एकदा का ही खात्री मुलांना पटली की, मग तुमच्या मुलांना कोणी थांबवू शकत नाही. त्यांच्या प्रगतीचा रथ विजयपथावरून वेगाने दौडू लागतो. त्यांच्यातील खेळाडूला स्फुरण येते. त्यांच्यामधल्या कलावंताच्या प्रतिमेला धुमारे फुटू लागतात. आपल्याला काय करायचे आहे, तर मुलांना' स्वतःवर विश्वास ठेवायला शिकवायचे आहे.'

एक विद्यार्थी होता माझ्या शाळेत. तो वर्गात उठून दिसावा, लक्षात यावा असा खूप काही चुणचुणीत नव्हता कधीच. लक्षातही नाही येणार त्याचं अस्तित्व असा सरळसाधा. फार चपळही नव्हता. शांत, धीरोदात्त भाव असायचा त्याच्या चेहऱ्यावर. त्याची चणही ठीकठाकच होती. आवश्यक तेवढी उंची, फार दणकट, मजबूत नव्हताच मुळी. मला नेहमी वाटायचे की हे सगळे असले तरी हा hidden gem, हा झाकलं माणिक आहे. इस हिरो को तराशना जरुरी है! काही प्रयत्न करून या हिऱ्याला योग्य आकार दिला, तर हा नक्कीच चमचम करेल, झळाळी येईल त्याला.

तो प्रत्येक वक्तृत्व स्पर्धेची सूचना आली की, आनंदून जायचा ती एक्साईटमेंट त्याच्या चेहऱ्यावर दिसायची. तो स्पर्धेसाठी नावही द्यायचा. स्पर्धेत सहभागी व्हायचा मात्र माईकसमोर उभा राहिला की सात-आठ वाक्यं बोलल्यावर ब्लँक व्हायचा. पुढचे काही आठवायचंच नाही त्याला. हसू व्हायचं. तो खिन्न व्हायचा. आपण कधीच पूर्ण भाषण करू शकणार नाही असं त्याला वाटायचं. मागच्या आठवड्यात मनातले हे सारं त्याने मला बोलून दाखवले अर्थातच मीच त्याला विचारले होतं की काय होतंय नेमकं माईकसमोर गेल्यावर तुला?

तो म्हणाला मॅडम, मी खूप प्रयत्न करतो पण मी अपयशीच ठरतोय. मी दरवेळेला अर्धवटच भाषण करतो. असं वाटतं हे मला जमणार नाहीय कधीच. मी त्याला म्हटलं तू हे कधीच सोडणार नाहीयंस. त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हटलं, त्याच्या नजरेला नजर देऊन म्हटलं की तुला यशस्वी होण्यासाठी फक्त तीन गोष्टींची गरज आहे. प्रयत्न करण्यासाठी तुझं मनोधैर्य, तुझ्या मेंदूचे अचूक विचार जे तुला शोधायला मदत करतील की नेमकं काय, कुठे चुकतंय? आणि तुझं हृदय जे तुला सांगेल की कधीच माघार घ्यायची नाही आणि सुकृत गमतीची गोष्ट ही आहे की या तीनही गोष्टी तुझ्याकडे आधीपासूनच आहेत. ही तीन वाक्यं सुकृतच्या मनावर जणू कोरली गेली असं वाटलं. त्याच्या चेहऱ्यावर निश्चय होता.

पुढच्या स्पर्धेसाठी त्याचा सराव सुरू झाला. त्याला पहिली टीप दिली होती. बोलताना 'आय लेव्हलला' बघ. समोर बसलेल्यांकडे बघितलं की, तू विसरतो आहेस. आत्मविश्वास पूर्णपणे आला की, मग श्रोत्यांच्या नजरेला नजर भिडवून बोलायचं. पाठांतर नाही तर विषय सहज बोलायचा जणू मित्रांशी बोलतो आहेस. त्याचा आवाज, भाषा, चढउतार, विषयाची मांडणी छानच आहे याची जाणीवही करून दिली. हळूहळू त्याला ते जमू लागले. वक्तृत्व स्पर्धा संपली. तो ऑफिसमध्ये आला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

अखेरीस सुकृत जिंकला. त्याने आपल्या भीतीवर मात केली होती. त्याची इच्छा, मनोधैर्य, नेमका अडथळा शोधून काढणं आणि कधीही हार मानायची नाही ही हृदयाची हाक या तीन गोष्टींनी त्याला स्वतःवर विश्वास ठेवायला शिकवलं. मॅडम, मी जिंकलो असं म्हणत जेव्हा अकरा वर्षांच्या सुकृतने पायावर डोकं ठेवून नमस्कार केला तेव्हा मी फक्त एवढंच म्हटलं' सुकृत तुझा स्वतःवरचा विश्वास जिंकला'

पालकांनो,

१. तुमच्या मुलांकरिता हे लक्षात ठेवा की मुलं स्मार्ट, चपळ नसली किंवा काही नैसर्गिक बुद्धी, कला, खेळ यांचं देणं त्यांना नसलं तरी हरकत नाही. गरज खरंच कशाची आहे तर यशस्वी होण्यासाठी मुलं जे प्रयत्न करताहेत त्याकडे तुमचं किंवा कोणाचं लक्ष आहे की नाही?

२. तुम्ही त्यांच्यात असलेल्या मूलभूत क्षमतांवर विश्वास ठेवताय का? की ते जरी त्या गोष्टीसाठी संघर्ष करत असले, त्यांना खूप प्रयत्न करावे लागत असले तरी त्यांच्यात पोटेन्शिअल आहे.

३. तुम्ही पालक या नात्याने त्यांना असं म्हणता का तू 'परफेक्ट' असला पाहिजे असा माझा आग्रह नाही, पण तू प्रयत्न करणं सुरू ठेव. मी तुझ्याबरोबर आहे.

४. बरीचशी मुलं ही आळशी आहेत म्हणून प्रयत्न करणे सोडून देतात असं आपल्याला वाटतं पण तसं नाही. खरं काय आहे तर त्यांना हा विश्वास वाटत नाही की, आपण प्रयत्न केल्याने नक्कीच फरक पडेल.

खरं सांगू का पालकांनो,

१) तुम्ही जे बोलता ना त्यांच्याबाबत तो कदाचित त्यांच्याही मनातून येणारा आवाज असेल.

२) तुम्ही जर प्रोत्साहन दिलंत तर त्यांना परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता विकसित करता येईल.

३) जेव्हा तुम्ही म्हणाल की तुझ्यात प्रयत्न करण्याची मनापासून इच्छा आहे, ती हिंमत आहे.

४) आपण एकत्र काम करून शोधून काढू या की काय चुकतंय?

तू किती मेहनत करतो आहेस ते मी पाहतो आहे. मला खरंच तुझा अभिमान वाटतो.

तुम्ही फक्त होमवर्क, खेळ यातच मुलांना मदत करायची नसते तर तुम्हाला मुलांच्या मेंदूवर हे वाक्य कोरायला हवं की 'मी नक्कीच प्रगती करू शकतो. मी प्रॉब्लेम सोडवू शकतो. मी कठीण आव्हानं स्वीकारू शकतो.

तुम्ही मुलांवर दाखवलेला हा विश्वास मुलांना प्रगतीच्या मार्गावर खूप लांबवर घेऊन जाईल. नुसतं टॅलेंट मुलांना प्रगतीसाठी उपयोगी नाही, तर त्यापेक्षाही जास्त त्यांना स्वतःविषयी वाटणारा विश्वास मुलांसाठी खूप महत्त्वाचा असतो. म्हणून जर तुम्हाला असं वाटत असेल की तुमच्या मुलाने अजूनही सर्वोत्कृष्ट प्रगती केलेली नाही, तर एक दीर्घ श्वास घ्या. कारण मुलांना फक्त या तीन गोष्टी करायला हव्यात त्या म्हणजे,

१) सराव
२) दृष्टिकोन
३) संयम

शांत राहून त्यांच्यावर विश्वास ठेवा. ते विसरले तरी त्यांना आठवण करून देत राहा. आपल्याला मुलांना फक्त मोठं करायचं नाहीय, तर आयुष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी त्यांना तयार करायचंय.

# "बाते हैं बातों का क्या?"



नॉस्टॅल्जिया


श्रीनिवास बेलसरे



मनोजकुमारच्या 'उपकार'ची (१९६७) अनेक वैशिष्ट्ये होती. एक तर तो मनोजकुमारने दिग्दर्शित केलेला पहिला सिनेमा होता. दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याला खुद्द स्व. लालबहादूर शास्त्रीजींनी त्यांच्या "जय जवान जय किसान" या घोषणेचा आशय 'लोकांपर्यंत पोहोचवायला सिनेमा काढ' अशी सूचना केली होती. तिसरे म्हणजे या सिनेमात आपल्या महेश कोठारे यांनी लहानपणीच्या मनोजकुमारची भूमिका केली होती.

स्व. शास्त्रीजींनी सुचवलेल्या विषयावरची उपकारची कथा मनोजकुमारने लिहिली ती दिल्ली ते मुंबई या रेल्वेप्रवासात! त्याचे उत्तम ग्रामीण बोलीतले संवाद लोकप्रिय झाले होते.

कथा होती दोन भावांची. भारत (मनोजकुमार) हा गावात राहून शेती करणारा शेतकरी आहे. त्याने धाकटा भाऊ पुरनला (प्रेम चोपडा) उच्च शिकवण्यासाठी शहरात पाठवले आहे. त्यासाठी त्याने खूप कष्ट घेतले आहेत; परंतु तो शिक्षण पूर्ण करून जेव्हा गावात परततो तेव्हा पूर्णपणे बदललेला, स्वार्थी माणूस झालेला आहे. त्यातून संपत्तीचे वाद सुरू होतात. त्याला त्याचा हिस्सा घेऊन विकून टाकायचा आहे.



तेवढ्यात १९६५चे भारत-पाक युद्ध सुरू होते आणि भारत सैन्यात नोकरी करायला निघून जातो. इकडे काका चरणदासच्या नादी लागून अगदी स्वार्थी बनलेला पुरन युद्धकाळाचा फायदा घेऊन अन्नधान्याची साठेभाजी करतो आणि नफा कमावतो.

दरम्यान भारत युद्धात बहादुरी दाखवतो, मात्र शत्रूच्या तावडीत सापडतो आणि हुशारीने सुटूनही येतो. युद्धात त्याचे दोन्ही हात गेले आहेत. तो गावात परत येतो तेव्हा पुरनच्या लक्षात येते की, कारस्थानी चाचा दोन्ही भावात भांडणे लावण्याचा प्रयत्न करत होता. पश्चाताप होऊन शेवटी पुरन भावडीलभावाजवळ जातो आणि दोघे भाऊ एक होतात व सिनेमा सुखांत होतो.

सिनेमात मनोजकुमारबरोबर अनेक दिग्गज कलाकार होते. आशा पारेख, प्राण डेव्हिड, कामिनी कौशल, मदन पुरी, अरुणा इराणी, मोहन चोटी आणि टूनटून.

सिनेमाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे फिल्मफेयर पारितोषिक मिळाले. मनोजकुमारला सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे, कथेचे, संवादलेखनाचे तर प्राणला सर्वोत्तम सहाय्यक अभिनेत्याचे, गुलशन बावरा यांना सर्वोत्कृष्ट गीतकाराचे, बी. एस. ग्लाड यांना सर्वोत्तम संकलनाचे पारितोषिक मिळाले. याशिवाय सर्व द्वितीय राष्ट्रीय चित्रपटाचे आणि बॉम्बे फिल्म जर्नालिस्ट असोसिएशनचे सर्वोत्तम संवाद लेखनाचे पारितोषिक मनोजकुमारला, सर्वोत्कृष्ट गायकाचे महेंद्रकपूरला मिळाले. कल्याणजी-आनंदजींचे आणि महेंद्रकपूरचे नामांकन सर्वोत्कृष्ट संगीतकार आणि सर्वोत्कृष्ट गायक म्हणून फिल्मफेयरसाठी झाले होते.

कमर जलालाबादी, इंदीवर, गुलशन बावरा आणि प्रेम धवन या ४ गीतकारांची सर्व गाणी लोकप्रिय झाली. त्यात सदाबहार 'मेरे देशकी धरती' बरोबरच प्रेम धवन यांचे "आई झुमके बसंत, झुमो एक रंगमे, आज रंग लो दिलोंको एक रंगमे" गुलशन बावरा यांचे "हर खुशी हो वहा, तू जहां भी रहे" विशेष लोकप्रिय झाले. बिनाका गीतमालातही "मेरे देशकी धरती सोना उगले उगले हिरे मोती" चांगलेच गाजले.

सिनेमात प्राणला प्रथमच सकारात्मक भूमिका मिळाली होती. तीही प्रेक्षकांनी उचलून धरली. त्यांच्या तोंडी असलेले गुलशन बावरांचे गाणे एखाद्या अध्यात्मिक गुरूसारखे गंभीर संदेश देणारे होते. एका पायाने लंगडा असणारा मलंगचाचा (प्राण) ते गात गावात फिरत असतो. त्याला जणू भोळ्याभाबड्या भारतला सावध करायचे असते. भारत कुणावरही विश्वास ठेवणारा, सगळ्यांचे चांगले चिंतणारा साधासरळ ग्रामीण युवक आहे. त्याला बदलत्या जगापासून सावध करण्यासाठीच जणू प्राण म्हणतो तू सगळ्यांवर विश्वास ठेवू नकोस, प्रेम, शपथा, आणाभाका या गोष्टी तावूनसुलाखून पाहिल्यावरच विश्वास ठेवायच्या असतात. जगातली अनेक नाती केवळ स्वार्थाच्या धाग्याने बांधलेली असतात. प्रसंग आल्यावर कुणी कुणाचे नसते.-

'कसमें वादे प्यार वफा सब<br>बातें हैं, बातोंका क्या?<br>कोई किसीका नहीं ये झूठे<br>नाते हैं, नातों का क्या?<br>कसमें वादे प्यार वफा...'

मलंगचाचा मुस्लीम आहे. त्यामुळे त्याचे भावविश्व त्याच्या श्रद्धावर आधारलेले आहे. तो म्हणतो, 'अशीही वेळ येईल की तुझा प्रेषित, उद्धारक तुझ्यासमोर उभा असेल तरीही तू वाचणार नाहीस. तुझे जीवलगच तुझा घात करतील. आदर्शाची स्वप्ने पाहत तू आकाशात उडत असशील पण तुझी नियती तुला क्षणात मातीत आणून मिळवेल.'

**'होगा मसीहा सामने तेरे,<br>फिर भी न तू बच पायेगा.<br>तेरा अपना खूनही आखिर<br>तुझको आग लगायेगा.<br>आसमानमें उडनेवाले,<br>मिट्टी में मिल जायेगा.<br>कसमें वादे प्यार वफा...'**

या जगात सगळे सुखाचे साथी आहेत. सुख आहे तोवर तुझ्याबरोबर बागडणारे, तुला प्रेमाची, मैत्रीची खात्री देणारे दुःख येताच तुला सोडून जातील. तुझ्या मनाचा ते जराही विचार करणार नाहीत. यांचे मन इतके स्वार्थी आणि संवेदनशून्य असते की ते प्रत्यक्ष परमेश्वरालाही जुमानत नाहीत तर माणसाची काय कथा?

**'सुख में तेरे साथ चलेंगे,<br>दुख में सब मुख मोडेंगे.<br>दुनियावाले तेरे बनकर,<br>तेराही दिल तोड़ेंगे.<br>देते हैं भगवानको धोखा,<br>इन्सांको क्या छोड़ेंगे!<br>कसमें वादे...'**

युद्धानंतर, दंगलीनंतर मंदिरे, मशिदी तोडल्या जातात हे तसे भारतात नेहमीचे दृश्य. पण त्यावर मलंगचाचा जे प्रश्न विचारतो ते खरंतर आजच्या भारतालाही अंतर्मुख करणारे आहेत. मलंगचाचा म्हणतो जर हे हिंदू व्यक्तीचे काम असेल तर त्याने देवाचे मंदिर कसे काय लुटले? जर हे काम मुस्लिमाचे असेल तर



त्याने खुदाशी संवाद साधण्याचे त्याचे घर कसे काय तोडले? म्हणजे देव मानणाऱ्या दोघांनी एकमेकांच्या देवाची घरं तोडली, लुटली. हे ज्यांना चालते, हे ज्यांना योग्य वाटते त्या कुणाचाही धर्म खरा धर्म कसा असेल? ती तर धर्माची खोटी कल्पना!

**'काम अगर ये हिन्दूका है,<br>मंदिर किसने लूटा है?<br>मुस्लिमका है काम अगर ये,<br>खुदाका घर क्यूँ टूटा है?<br>जिस मजहबमें जायज है ये,<br>वो मजहब तो झूठा है<br>कसमें वादे प्यार वफा...'**

इंदीवर यांनी मलंगचाचाच्या तोंडी टाकलेल्या या भेदक प्रश्नामुळेच कदाचित गाण्याचे हे कडवे कधीच आकाशवाणीवर वाजवले गेले नसावे.

सिनेमाच्या कथेबाहेर जाऊन असे एकंदर जीवनाबद्दल गंभीर भाष्य करणारी, कुणाच्याही व्यक्तिगत दुःखात त्याला दिलासा देणारी चिंतनशील गाणी दिसतात का अलीकडे एखाद्या सिनेमात? असतील तर सांगा!

# मी लिहून देतो की...



संवाद

गुरुनाथ तेंडुलकर



५ ऑक्टोबर २००७ या दिवशी क्रिकेटच्या इतिहासात एक अभूतपूर्व घटना घडली. हैदराबादच्या स्टेडियमवर भारत विरुद्ध ऑस्ट्रेलियाचा एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामना सुरू होता. या सामन्यामध्ये ऑस्ट्रेलियाच्या ब्रेड हॉग नावाच्या गोलंदाजाने भारताच्या सचिन तेंडुलकरची विकेट घेतली. ब्रेड हॉगने टाकलेल्या बॉलचा अंदाज न आल्यामुळे सचिन तेंडुलकरची दांडी उडाली. ऑस्ट्रेलियन संघाच्या उत्साहाला अचानक भरतं आलं होतं. ब्रेड हॉग तर आनंदाने बेभान झाला होता. क्रिकेटचा सम्राट असा लौकिक असलेल्या सचिन तेंडुलकरची विकेट मिळाली. अहो भाग्यम्... त्याच्या संघातील सहकार्यांनी त्याचं कौतुक केलं. त्याने स्वतःदेखील स्वतःची पाठ थोपटून घेतली. सामना संपल्यानंतर त्या सुवर्णक्षणाचा फोटो घेऊन ब्रेड हॉग सचिनकडे गेला आणि म्हणाला, 'सर, आज माझ्या आयुष्यातला अत्यंत आनंदाचा दिवस आहे. त्या दिवसाची आठवण म्हणून मला या फोटोवर मला आपली स्वाक्षरी हवी आहे.'

सचिनने एकदा ब्रेड हॉगकडे आणि एकदा त्याच्या हातातल्या फोटोकडे पाहिलं आणि त्या फोटोच्या मागे लिहिलं. 'ब्रेड हॉग, हा दिवस तुझ्या आयुष्यात पुन्हा कधीही येणार नाही.' हे वाक्य लिहून सचिनने त्याखाली सही केली. ब्रेड हॉगने मस्तीत खांदे उडवले आणि विजयोन्मादात तो फोटो घेऊन निघून गेला.

त्यानंतर भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान अनेक सामन्यांमध्ये ब्रेड हॉग आणि सचिन तेंडुलकर आमने-सामने आले. एक दोन नव्हे तर तब्बल पंचेचाळीस सामन्यांमध्ये ब्रेड हॉगने सचिन तेंडुलकरची विकेट मिळवण्यासाठी जीवाचा आटापिटा केला पण... पण तो एकदाही यशस्वी होऊ शकला नाही. सचिन तेंडुलकरने ब्रेड हॉगची बॉलिंग प्रत्येक वेळी झोडपून काढली.

५ ऑक्टोबरची पुनरावृत्ती कधीच होऊ दिली नाही. 'हा दिवस तुझ्या आयुष्यात पुन्हा कधीही येणार नाही.' असं जे लिहून दिलं होतं ते शब्द सचिन तेंडुलकरने खरे ठरवले.

पण... पण ते शब्द खरे ठरवण्यासाठी सचिनने काय काय केलं असेल याची जरा कल्पना करा.

सचिनने ब्रेड हॉगच्या प्रत्येक बॉलिंगचा व्हीडिओ अनेकदा पाहिला. त्याच्या बॉलिंगचा नव्याने अभ्यास केला. त्याचबरोबर आपण आजवर कुठे कुठे चुकलो? आणि का चुकलो? याचाही अभ्यास केला. दररोज करत असलेली नेट प्रॅक्टिस अधिक जोमाने करायला सुरुवात केली. नवीन तंत्र आत्मसात केली. फिटनेस वाढवला. सामन्याच्या वेळी स्टेडियममध्ये उपस्थित हजारो प्रेक्षक आरडा-ओरडा करत असताना थंड डोक्यानं प्रत्येक बॉल कसा खेळायचा यासाठी खास प्रशिक्षण घेतलं आणि... आणि ब्रेड हॉगला दिलेला शब्द खरा केला.

आपणही आपल्या आयुष्यात अनेकदा चुका करतो. अनेकदा अपयशी होतो, पण आपण त्या चुका कधीच मान्य करत नाही. किंबहुना आपण आपल्या अपयशाचं खापर इतर कुणावर तरी फोडतो. जर चुकीला जबाबदार कुणी नाही तर दुसरं सापडलं नशिबाला दोष देतो. 'बॅड लक...' म्हणतो. हजारो कारणं सांगतो. पण स्वतःकडे मात्र दोष घेत नाही. आपले प्रयत्न कमी पडले किंवा आपल्या कामाची दिशा चुकली हे मान्य न करता भलतीच कारणं सांगतो. आपली चूक नव्हतीच असं स्वतःच स्वतःला समजावतो. परिणामी त्याच त्याच चुका पुन्हा पुन्हा घडतात आणि पुन्हा पुन्हा अपयश येतं.

एकदा आलेल्या अपयशानंतर त्याची पुनरावृत्ती न करता यशस्वीच व्हायचं असेल तर त्यासाठी सर्वात प्रथम म्हणजे आपली चूक मान्य करायला हवी. अपयश का आलं हे शोधून त्याची स्वतःच स्वतःशी कारणमीमांसा करायला हवी. ज्या चुकीमुळे अपयश आलं त्या चुकांचं पृथक्करण करून त्या चुका पुन्हा होणार नाहीत यासाठी काळजी घ्यायला हवी. नवीन तंत्र शिकायला हवी. पुन्हा नव्या जोमाने प्रयत्न करायला हवेत.

आणि हे साध्य होण्यासाठी सर्वांत आधी स्वतःच स्वतःला एक वचन द्यायला हवं. 'असं पुन्हा कधीही होणार नाही.'

अनेक मानसशास्त्रज्ञ आणि प्रेरणा प्रशिक्षक मंडळी नेहमी सांगतात की, 'तुम्ही एखादी गोष्ट मिळवण्यासाठी तुमचं उद्दिष्ट कागदावर नीट लिहून काढा. जी गोष्ट तुम्हाला साध्य करायची आहे ती स्वतःच्या हातांनी कागदावर लिहून काढा. त्या कागदावर सही करून तो कागद दररोज तुमच्या नजरेसमोर राहील अशा प्रकारे ठेवा. त्यानंतर उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्यासाठी काय काय परिश्रम करावे लागतील त्याची यादी करून प्लान बनवा, योजना आखा आणि त्यानुसार कामाला लागा...'

संस्कृतमध्ये एक वचन आहे

अक्रमेणा अनुपायेन कार्यारंभो<br>न सिध्यति।

भावार्थ : कोणतंही मोठं काम करण्यासाठी त्या कामाचा अनुक्रम आणि त्यासाठी करावे लागणारे उपाय याचं व्यवस्थित नियोजन केल्याशिवाय कार्य सिद्धीस जात नाही.

म्हणूनच कार्य सिद्धीस जाण्यासाठी केवळ नशिबावर हवाला न ठेवता योग्य ती आखणी आणि त्यानुसार परिश्रम करणं महत्त्वाचं ठरतं.

अपयशापासून यशापर्यंतच्या प्रवासातली पहिली आणि महत्त्वाची पायरी म्हणजे स्वतःच्या यशाची स्वतःलाच हमी देणं. मी यशस्वी होणारच हे स्वतःच्या अंतर्मनात रुजवणं.

वर उल्लेख केलेल्या क्रिकेटच्या किस्स्याचा नीट विचार केला तर सचिन तेंडुलकरने शब्द ब्रेड हॉगला दिला नव्हता तर त्याने स्वतःच स्वतःला शब्द दिला होता.

आपल्यालाही दैनंदिन आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचं असेल तर स्वतःच स्वतःला वचन द्यायचं. अगदी लेखी स्वरूपात वचन द्यायचं.

आज रोजी मी लिहून देतो की...

# त्रिशंकू



महाभारतातील मोतीकण

भालचंद्र ठोंबरे

सूर्यवंशातील इक्ष्वांकूच्या कुळात त्रिबंधन नावाचा राजा होऊन गेला. त्याला सत्यव्रत नावाचा मुलगा होता. सत्यव्रताचा मुलगा हरीश्चंद्र (हरीश्चंद्र तारामती.) होता. हा सत्यव्रत सुंदर; परंतु अत्यंत कामुक होता. त्याचे आपल्या देहावर अत्यंत प्रेम होते. तसेच सदेह स्वर्गाला जाण्याची त्याची इच्छा होती. एकदा त्याने एका नववधूला लग्नातून पळवून आणले. त्यामुळे क्रोधीत झालेल्या पित्याने त्याला तू चांडाळ होशील असे म्हणून राजमहालातून हाकलून दिले. हा सत्यव्रत वनात राहून चांडाळाप्रमाणे स्वतःची उपजीविका करू लागला.

एकदा भयंकर दुष्काळ पडला असताना काहीही खाण्यास मिळाले नसल्याने त्याने वशिष्ठ ऋषींच्या आश्रमात असलेली गाय मारून खाल्ली. वशिष्ठ ऋषींना हे कळताच त्यांनी त्याला पित्याला त्रास देणे, नववधूला पळविणे व गुरुची गाय मारून खाणे या तीन पाप (शंकू)साठी त्रिशंकू म्हणून ओळखला जाशील असा शाप दिला.

चांडाळ योनीत गेला तरीही सत्यव्रताला सदेह स्वर्गात जाण्याची इच्छा होती. त्यासाठी तो प्रथम वशिष्ठाकडे गेला, मात्र पंचमहाभुतांनी बनलेले हे शरीर घेऊन कोणीही स्वर्ग लोकात जाऊ शकत नाही, त्याबद्दल काही असे सांगून त्यांनी नकार दिला. त्रिशंकू त्यांच्या मुलाकडे गेला; परंतु मुलांनीही पित्याने ज्या गोष्टीला नकार दिला त्या गोष्टी आमच्याकडून होणार नाहीत, असे सांगितले.

तेव्हा तो विश्वामित्रांकडे गेला. ऋषी विश्वामित्र व वशिष्ठ ऋषी यांच्या मध्ये नेहमीच वर्चस्वाची स्पर्धा असे. विश्वमित्रांनी त्रिशंकूला ओळखून त्याच्या सद्यस्थितीबद्दल विचारणा केली. तेव्हा सत्यव्रताने आपली इच्छा व घडलेली सर्व घटना सांगितली असता, विश्वामित्रांनी त्याला सदेह स्वर्गात पाठवण्याचे आश्वासन दिले. काही आख्यायिकेनुसार त्रिशंकूला त्याच अवस्थेत स्वर्गात पाठविण्याचे ठरविले, तर स्कंद पुराणातील कथेनुसार विश्वामित्रांनी प्रथम त्याला शापमुक्त करण्याचे ठरविले. त्यासाठी ते त्रिशंकूसह मार्कंडेय ऋषीकडे गेले. मार्कंडेय ऋषींनी त्याला हाटकेश्वर येथील पाताळगंगेत स्नान करण्यास सांगितले. त्याप्रमाणे स्नान केले असता त्रिशंकू शापमुक्त झाला.

विश्वमित्रांनी आपल्या शिष्यांना यज्ञांची तयारी करण्यास सांगितले व या यज्ञासाठी अन्य ऋषींना आमंत्रित करण्यास पाठविले. मात्र यज्ञात सहभागी होण्यास नकार देऊन वशिष्ठ व वशिष्ठांच्या मुलांनी येण्याचे नाकारले. वशिष्ठ व त्यांची मुले वगळता सर्व ऋषी सहभागी झाले.

यज्ञ समाप्तीनंतर विश्वमित्रांनी देवतांना आपापला यज्ञभाग घेण्यास आमंत्रित केले, मात्र कोणीही देवता प्रकट झाली नाहीत. तेव्हा विश्वामित्रांनी आपल्या तपोबलाच्या साहाय्याने त्रिशंकूला स्वर्गरोहणासाठी पाठविले. त्रिशंकू सदेह स्वर्गात येत असलेलं पाहून इंद्राने त्याला अटकाव केला व ढकलून दिले.

तेव्हा खाली डोके वर पाय अशा स्थितीत तो पृथ्वीकडे पडू लागला. त्याने जोरजोराने विश्वामित्रांना आवाज दिला. विश्वामित्रांनी त्याला खाली येऊ नको तिथेच थांब असे म्हणून आपल्या सामर्थ्याने त्याला तेथेच स्थिर केले.

एवढेच नव्हे तर देवांनी त्रिशंकूला स्वर्गात येऊ दिले नाही तरी आपले वचन पूर्ण करण्यासाठी विश्वमित्रांनी त्याच्यासाठी त्याच ठिकाणी स्वर्ग निर्माण केला. तसेच ते एका नव्या इंद्र व देवतांसह नव्या सूर्यासह ब्रह्मांडाच्या सृष्टीच्या निर्मितीचा विचार करू लागले. हे पाहून इंद्र व अन्य देवता भयभीत झाले. ते सर्व विश्वमित्राकडे आले व निसर्गनियमाविरुद्ध निर्मिती न करण्याची विनंती केली व कोणीही सदेह स्वर्गात प्रवेश करू शकत नाही म्हणून आपण सत्यव्रताला स्वर्गात प्रवेश करू दिला नाही, तेव्हा आपण नवीन ब्रह्मांड निर्मितीच्या विचाराचा त्याग करावा, अशी विनंती केली. ती मान्य करून विश्वमित्रांनी आता त्रिशंकू या नव्या स्वर्गातच वास्तव्यास असेल असे जाहीर केले. इंद्रानेही ते मान्य करून केवळ त्यास अशा उलट अवस्थेतच ठेवावे ही विनंती केली. तर काही आख्याखिकेनुसार इंद्राने नवीन स्वर्ग निर्मिती न करण्याची विनंती करून त्रिशंकूला स्वर्गात नेण्याचे मान्य केले व त्रिशंकूला स्वर्गात स्थान दिल्याचीही आख्याखिका आहे.

त्रिशंकूच्या कथेवरून निसर्ग नियमाविरुद्ध जाण्याचा प्रयत्न करू नये, अन्यथा मध्येच कुठेतरी अडकून 'न घरका ना घाट का,' अशी परिस्थिती उद्‌भवू शकते असा बोध मिळतो. तेव्हापासून कोणत्याही एखाद्या गोष्टीच्या पूर्णत्वामध्ये कमतरता असेल तर तिची अवस्था त्रिशंकू झाली, असे म्हणण्याचा प्रघात पडला. उदाहरणार्थ जर सरकार स्थापनेसाठी कोणत्याही पक्षाकडे पूर्ण बहुमत नसेल तर त्रिशंकू अवस्था झाली असे म्हणतात.

# गोपीनाथगडावर उसळणार अलोट गर्दी



रक्तदान, आरोग्य तपासणी, पशूसंवर्धन कॅम्प, वृक्ष रोपांचे वाटप

रामायणाचार्य ढोक महाराजांचे सुश्राव्य कीर्तन

लाभ घेण्याचे संयोजन समितीचे आवाहन

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांना अभिवादन

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:आपल्या लाडक्या लोकनेत्यास अभिवादन करण्यासाठी उद्या ३ जून रोजी गोपीनाथ गडावर राज्यभरातील कार्यकर्त्यांची मोठी गर्दी उसळणार आहे.गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या स्मृती दिनानिमित्त ३ जून रोजी विविध लोकोपयोगी उपक्रम राबवण्यात येत असून ह.भ.प. रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांचे सुश्राव्य कीर्तनाचा सर्वांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असं आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

गोपीनाथगड येथे स्मृतीदिनाची जय्यत तयारी झाली आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यावर अफाट प्रेम करणारे राज्यभरातील असंख्य मुंडेप्रेमी यादिवशी गोपीनाथगड येथे नतमस्तक होऊन आपल्या लाडक्या नेत्याला अभिवादन करणार आहेत.राज्याच्या पर्यावरण आणि पशूसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांच्यासह मुंडे कुटुंबीय आणि राज्यभरातून असंख्य मान्यवर स्मृती दिनानिमित्त गोपीनाथगड येथे उपस्थित राहणार आहेत. यावेळी गडावर रक्तदान शिबीर, वाहन चालकांची आरोग्य तपासणी, पशूसंवर्धन कॅम्प, जनावरांना औषधांचे वाटप, पर्यावरण संवर्धनासाठी विविध वृक्षांच्या रोपांचे वाटप असे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

### ढोक महाराजांचे सुश्राव्य कीर्तन

सामाजिक उपक्रमा बरोबरच उद्या दुपारी १२ ते २ वा. यावेळेत प्रसिद्ध कीर्तनकार रामायणाचार्य ह.भ.प रामराव महाराज ढोक यांचे सुश्राव्य कीर्तन आणि त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. गडावर येणाऱ्या मुंडे भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची आणि महाप्रसादाची व्यवस्था देखील करण्यात आली आहे.

# रखडलेले कामे होणार पुर्ण!

धोरण:आ.सोळंकेंच्या प्रयत्नातून कोट्यवधीचा निधी!



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:केज तालुक्यातील वरपगाव येथील रखडलेल्या कामासाठी आमदार प्रकाश सोळंके यांनी कोट्यवधीचा निधी मंजूर केला आहे मौजे वरपगाव केजी या गावी १९९८ साली शासनाने विशेष बाब म्हणुन पुर्नवसन केले, गावात अनेक आंदोलन उपोषण केले व शासनास विशेष बाब म्हणून पुर्नवसन करण्यास भाग पाडल इतर सर्व सुविधा मिळाल्या परंतु गावावरील रस्ते व नालीकाम चे काम काही तांत्रिक बाबीमुळे झाले नाही. ज्याचा त्रास आजपर्यंत गावाला भोगावा लागला २०१९ साली माजलगावचे आमदार प्रकाश दादा सोळके यांनी सदर कामाच्या संदर्भात विधानसभेत लक्षवेधी सादर केला. त्यास उत्तर सतत्कालीन मदत व पुर्नवसन मंत्री यांनी निधीची घोषणा केली. परंतु घोषणा होवुन सुद्धा पुढ काहीच कामाची कार्यवाही झाली नाही तरी २०२२ साली झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत अँड बाबुराव देशमुख यांचा विजयी झाला व त्यांनी आ. प्रकाशदादा सोळकें, संबंधीत मंत्री, मंत्रालय मध्ये वारंवार पाठपुरावा करून दि. १३ में २०२५ रोजी आ.प्रकाश दादा सोळंके यांच्या पाठपुरावण्याने मा. मकरंद आबा पाटील यांच्या बैठकीत सदर प्रश्न मार्गी लावला व सदर कामास १० कोटी ९९ लक्ष ५८ हजार इतक्या कामाना प्रशासकीय मान्यता मिळाली. त्याबद्दल पान २ वर

# बाजीराव चव्हाणांच्या कार्यालयास भेट!

चर्चेतले:मंत्री संजय राठोडांनी दिली भेट

पुण्यभूमी/प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री,शिवसेना नेते मा.ना.श्री.संजयजी राठोड साहेब युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या जनसंपर्क कार्यालय बीड येथे रविवारी सदिच्छा भेट देण्यासाठी आले होते. यावेळी युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या जनसंपर्क कार्यालय येथे मृद व जलसंधारण मंत्री यांचे जंगी स्वागत करण्याचे आयोजन करण्यात आले. युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या बीड येथील जनसंपर्क कार्यालयाला राज्यातील सर्वच मंत्री आमदार खासदार लोकप्रतिनिधी सदिच्छा भेट देण्यासाठी येत असतात. त्यावेळी युवासेनेची मराठवाड्यातील बुलंद तोफ, आज लाखो युवकांचे प्रेरणास्थान बनलेले युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांचे कौतुक राज्यातील मंत्री यांच्या तोंडून ऐकण्यास मिळते आहे. राज्याचे आरोग्यदूत, युवासेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी मराठवाड्यात युवासेना वाढवण्यासाठी आपली मोलाचे योगदान देऊ कष्टाने युवा सेनेचा विस्तार केला आहे. या त्यांच्या कौतुकास्पद कार्याला प्रेरित होऊन राज्यातील अनेक मंत्री आमदार खासदार त्यांच्या बीडच्या जनसंपर्क कार्यालयाला भेट देण्यासाठी येत राहतात. अशीच भेट देण्यासाठी रविवारी राज्याचे जलसंधारण व मृद राज्यमंत्री संजय राठोड हे त्यांच्या जनसंपर्क कार्यालयास भेट देण्यासाठी आले होते. त्यावेळी बाजीराव चव्हाण पान २ वर

# शेतकऱ्याने संपविले जीवन!

विवंचना: लिंबोडी येथील दुःखद घटना

पुण्यभूमी प्रतिनिधी



कडा:तालुक्यात अवकाळी पावसाने धुवाधार हजेरी लावल्याने हातातोंडाशी आलेल्या कांदा पिकाचे नुकसान झाल्याने आर्थिक अडचणीत आलेल्या गोविंद रंगनाथ आंधळे (वय- ४१) या कांदा उत्पादक शेतकऱ्याने शेतात करंजीच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना लिंबोडी येथे रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

आष्टी तालुक्यातील लिंबोडी येथील कांदा उत्पादक शेतकरी गोविंद रंगनाथ आंधळे यांनी दोन एकर शेतात कांदा पिकाची लागवड केली. मात्र मागील काही दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळीने हातातोंडाशी आलेले कांद्याचे पीक डोळ्यादेखत वाहून गेले. त्यामुळे निराश झालेल्या या शेतकऱ्याने, उसनवारी व डोक्यावरचे कर्ज कसे फेडायचे, या चिंतेने ग्रासलेल्या शेतकऱ्याने रविवारी सायंकाळच्या सुमारास शेतात गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली. त्यांच्या पश्चात आई-वडील पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.

मागील दोन दिवसापासून अवकाळीमुळे पान २ वर



**परळी:** राजमाता अहिल्यादेवी होळकरांच्या ३०० त्रिशताब्दी जयंतीनिमित्त अभिवादन करतांना रानबा गायकवाड, भगवान साकसमुद्रे,संतोष कुंडकर, नवनाथ दाने,विकास वाघमारे, मंजूळनाथ कुकर आदी.

# सावकाराच्या जाचाला कंटाळून घेतले विष

दुःखद:पन्नास हजाराचे लाख देऊनही,सावकाराकडून छळ

पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:दीड वर्षापूर्वी गावातीलच खासगी सावकाराकडून पन्नास हजार रुपये पाच टक्क्याने घेतले, त्याचे लाख रुपये दिले तरीही तीन हजारांसाठी घरी येऊन शिवीगाळ करत, या मानसिक त्रासाला कंटाळून मजुराने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. सदर घटना आठ दिवसांपूर्वी घडली. खासगी सावकाराविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा १ जून रोजी आष्टी पोलिसात दाखल करण्यात आला आहे.

आष्टी तालुक्यातील शिराळ येथील नानाभाऊ साहेबराव गायकवाड नामक मजुराने धिर्डी येथील सर्जेराव केरू करडुळे याच्याकडून पन्नास हजार रुपये पाच टक्के व्याजाने तोंडी बोलीवर वीस महिन्यांपूर्वी घेतले. त्या पन्नास हजाराचे व्याज व मुद्दल असे लाख रुपये दिले. तरी तीन हजार रुपयांसाठी सर्जेराव हा त्या मजुराला व घरच्या लोकांकडे सतत मागणी करून त्रास देत होता. २३ मे रोजी सकाळच्या दरम्यान मजुराच्या घरी येऊन तीन हजाराची मागणी करत शिवीगाळ केली. या मानसिक त्रासाला कंटाळून मजुराने विषारी द्रव्य प्राशन केले. त्याला अहिल्यानगर येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान प्रकृती स्थिर झाल्याने १ जून रोजी आष्टी पोलिस ठाण्यात नानाभाऊ गायकवाड याच्या फिर्यादीनुसार पान २ वर

# ... अन्यथा मंत्र्यांना फिरु देणार नाही

निवेदन:अपघातानंतर सामाजिक कार्यकर्ते संतप्त

पुण्यभूमी प्रतिनिधी




माजलगाव:महाराष्ट्रात सर्वाधिक अपघात माजलगाव-तेलगाव रोडवर झाले आहेत. यामध्ये अनेक निष्पाप लोकांना जीव गमवावा लागलेला आहे. तरी देखील या रस्त्याविषयी गांभीर्याने विचार केला जात नसल्याने संतप्त सामाजिक कार्यकर्त्यांनी आज दुपारी उपविभागीय अधिकारी यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे. या रोडचे तात्काळ डांबरीकरण करा अन्यथा शासनाच्या एकाही मंत्र्याला या रस्त्याने फिरू देणार नाही असा इशारा दिला आहे. त्याचबरोबर याच मागणीसाठी दि.५ जुन रोजी सकाळी १० वाजता परभणी चौक माजलगाव येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

माजलगाव-तेलगाव रोडवर काल दिवसभरात दोन अपघातात सहा जणांचा बळी गेला. त्यामुळे संतप्त सामाजिक कार्यकर्त्यांनी आज उपविभागीय अधिकार्यांची भेट घेतली. यावेळी एसडीएम इंगोले यांच्याशी शिष्टमंडळाने सविस्तर चर्चा केली. त्यांनी तात्काळ छत्रपती संभाजीनगरच्या एमएसआरडीसीच्या अधिकार्यांना फोन लावला, दोन दिवसांत या रोडचे डांबरीकरण करावे अशी लोकांची मागणी असल्याचे सांगितले. दरम्यान या प्रश्नी निवेदन देखील देण्यात आले आहे. निवेदनावर नारायण तौर, नुमान अली चाऊस, सय्यद तौफीक लाला, सुलतान मन्सुरी, इनामदार आमेर, गुड्डू खतीब, चाऊस शोयेब, नवीदोद्दीन सिद्दीकी, जुनैद जावेदअली, राजु कुरेशी, जयपाल भिसे, अनंतराव जगताप, भाई मुंजा पांचाळ, परमेश्वर डाके, मोमीन, बागवान आदिंच्या स्वाक्षर्या आहेत.

# केंद्र,राज्य सरकारमुळे नुकसान

वसंत मुंडे:सरकार विरोधात संतप्त प्रतिक्रिया

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी:भारतीय जनता पार्टीच्या केंद्र व राज्यातील सरकारने शेतकऱ्यांची भाव पाडून आर्थिक लूट केली व जनगणनेतून आरक्षणासाठी ओबीसीच्या जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न केला नाही असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. शेतकऱ्यांचे खरीप व रब्बीचे शेती मालाचे उत्पन्न तयार झाले की परदेशातून सर्व प्रकारचा शेतीमाल ठराविक टक्केवारी देणाऱ्या व्यापाऱ्यामार्फत मागून घेऊन टॅक्समध्ये सवलत देऊन संपूर्ण शेतीमालाचे भाव पाडून शेतकऱ्याचे जीवन उध्वस्त करण्याचा केंद्रातील व राज्यातील सरकारचा अजिंठा आहे. अमेरिका ब्राझील अर्जेंटिना चीन या देशात सोयाबीनचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर होते. भारत देशातील सोयाबीन व भाजीपाला फळे इतर पिकांमध्ये सरकारच्या चुकीच्या आयात निर्यात करा मध्ये सवलत धोरणामुळे शेतीमालाचे भाव नसल्यामुळे शेतकरी आर्थिक दृष्ट्या चिंताजनक असून संपूर्ण शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यापुढे गंभीर आर्थिक संकट उभे राहत असल्यामुळे आत्महत्या वाढत आहेत . संपूर्ण देशातील जातनिहाय जनगणना करण्याकरिता आर्थिक शैक्षणिक सामाजिक राजकीय विविध निकष दर्शवून मूल्यमापन जातनिहाय आरक्षणासाठी करणे काळाची गरज आहे. परंतु आरएसएस च्या विचारधारेचे केंद्र व राज्यातील बीजेपी सरकार संपूर्ण देशातील आरक्षण रद्द करण्याची वाटचाल करीत आहे. पान २ वर

## खा. बजरंग सोनवणे

## आंदोलन सरकारने गांभिर्याने घ्यावे: दीपक केदार

# पाण्याचा लोकलढा शेवटच्या श्वासापर्यंत लढू

पुण्यभूमी प्रतिनिधी



गेवराई:शेतकर्यांनी उभारलेला हा लोकलढा १४० गावच्याच शेतकर्यांचे नव्हे तर पाच तालुक्यातील शेतकर्यांचे भले करणारा हा लोकलढा आहे, हा लढा माझाच असून शेवटच्या श्वासापर्यंत हा लढा लढणार असल्याचा विश्वास खा. बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केला. तर, हे आंदोलन सरकारने गांभिर्याने घ्यावे, नसता महागात पडेल असा इशारा दिपक भाई केदार यांनी दिला. या भेटीनंतर उपोषणकर्ते अजय पाटील साळुंके यांनी उपचार घेतले.

यावेळी भाऊसाहेब जरांगे पाटील, समन्वयक दिनेश गुळवे, पुजाताई मोरे, सरपंच नवनाथ गवते, राहुल लोंढे, संतोष भारती, शिवसेना तालुकाध्यक्ष उद्धव मडके, उपजिल्हाप्रमुख काळे, ऋषीकेश बेदरे, परमेश्वर महाराज वाघमोडे, सरपंच रितेष साबळे, शेख शफिक, नारायण घोडसे, गणेश महाराज कोळेकर आदी उपस्थित होते. जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे यासह इतर मागण्यांसाठी गेल्या नऊ दिवसांपासून पान २ वर

### मंत्री राठोड यांचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश

या उपोषणाची प्रशासनाने योग्य दखल न घेतल्याने या आंदोलनाच्या समन्वयकांनी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांची भेट घेतली. यावेळी मंत्री राठोड म्हणाले शेतकर्यांचे हे प्रश्न आपण मंत्रीमंडळाच्या बैठकीत मांडू. तसेच या योग्य दखल घेण्याचे लेखी आदेशही त्यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना दिले. यावेळी मंत्री राठोड यांचे ओएसडी तात्काळ जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना बोलले.

**रात्री उशिराने उपोषण मागे** :रात्री ११ वाजण्याच्या दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उपोषणकर्ते अजय साळुंके यांच्या भ्रमनध्वनीद्वारे संभाषण झाले असता त्यांनी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.



### सर्वेक्षण करून पाणी द्यावे: राहुल लोंढे

लोकलढा आंदोलनाच्या रेट्यामुळे अधीक्षक अभियंता बीड यानी वरिष्ठांना सर्वेक्षण करण्याचे पत्र दिले आहे. हे सर्वेक्षण करून माजलगाव धरणासाठी १९८५ मध्ये ५६० दलघमी तर उजव्या कालव्यासाठी ३१८ दलघमी पाण्याची तरतूद होती. ही तरतूद २०१८ मध्ये कमी करून माजलगाव धरणासाठी २९९ दलघमी तर कालव्यासाठी २५५ दलघमी अशी कमी करण्यात आली, हे पाणी पुन्हा द्यावे अशी मागणी लोकलढा आंदोलनाचे समन्वयक राहुल लोंढे यांनी केली.

# सेवानिवृत्तीचा यथोचित समारंभ

ऋणानुबंध:अभियंता सुनिल इंगळेंच्या हस्ते गिरींचा सत्कार



भगवान साकसमुद्रे / परळी

परळी:औष्णिक विद्युत केंद्र परळी येथील प्रमुख भांडार विभागचे प्रभाग श्रेणी २,चे शिरीष यशवंत गिरी यांनी सेवेत वयाची ५८ वर्षे पूर्ण केल्यानंतर दिनांक ३० मे २०२५ रोजी परळी वीज निर्मिती केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.

गिरी यांनी वीज निर्मिती केंद्रात सुमारे ३४ वर्ष सेवा केली आहे.त्यांना दोन मुली आहेत.श्रुतीचे एमबीबीएस झाले असून त्या पान २ वर